म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
स. नं.
REFBK-0002570
REFBK-0002570

रविकिरणमंडळ

किरण

३

# उषा

लेखक

रविकिरणमंडळ

REFBK-0002570

टिळकस्मृतिदिन

९ मे १९२४

पुणें

प्रकाशक
यशवंत दिनकर पेंढरकर
व्यवस्थापक–वीणामंडळ, ४६१ शनवार, पुणें

रविकिरणमंडळाचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| किरण | ०४ |
| काव्यविचार | १ |
| उषा | ०१२ |

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें

कवि **अनंततनय**

यांस

सविनय समर्पण

# रविकिरणमंडळ

यशवंत

गिरीश

गजानन त्र्यंबक माडखोलकर

माधव जूलियन्

दत्तात्रय लक्ष्मण गोखले

श्रीधर रानडे

सौ० मनोरमा रानडे

दा. क्र. २५७०
सं. क्रमांक ६७०
दि. २-११-५२

# उषा

## नारायण वामन टिळक यांच्या समाधीपाशीं

साधी गोड रसाळ भावकविता ज्याची जनां तोषवी,
वेडा सृष्टिसखा, जयास पदवी, लाभे फुलांचा कवी;
येथें तो निजला प्रभूमधिं;—कुठें आतां सभोंतीं फुलें ?
ओसाडींत समाधि पाहुनि कसें हें चित्त शोकें उलें !
संसारीं विटलीं, मुमुक्षु बनलीं जीं रन्जलीं—गान्जलीं,
त्यांचें सान्त्वन ती तुक्यापरि करी ज्याची अभङ्गाञ्जली,
'आकाशांत फुलें, धरेवर फुलें' ज्यानें असें गाइलें,
सारें तें परि पुष्पवैभव अतां यद्गायनीं राहिलें—
त्याचें हें थडगें भिकार दिसतें मातीविटांचें पुढें,
त्याचें नांव दिसे पहा पुसट हें पाटीवरी बापुडें !
का नारायण येशुचा मिशनरी नाहीं मराठा कवी ?
भाषेला दिधली न काय कवनें त्याच्या नवी थोरवी ?
बाजूला थडगें—बहिष्कृत जणूं ! काळाच तो आदमी !
निद्रामन्दिर मर्मरी न म्हणुनी व्हावें कशाला श्रमी !
आरस्पान निषिद्ध होय बघतां तें मर्मरी अन्तर
वर्णाचा अभिमान जें न विसरे माणूस मेल्यावर.
तूझें स्मारक दिव्य अक्षय महाराष्ट्राचिया अन्तरीं;
अश्रूंचीं पडतात दोन सुमनें याही समाधीवरी.

२६।१०।२३, नगर — माधव जूलियन

# यशवंत

## निष्फळ प्रतीक्षा

प्रतीक्षा मी किती आतां करूं ? कंटाळला जीव !
सख्या ! ये राघवा ! प्रेमामृतातें शीघ्र पाजीव !
घडीमागें घडी जाते, युगें हीं लोटतीं वाटे,
उडी मन्मानसाची या न आतां थोपवे मातें.
किती मी आवरूं दृष्टी ? फिरुनी धांवते द्वारीं,
विवेका शक्ति ना आणावयातें तीस माघारी.
जिरावी एक तों तेथें दुजी हृत्सागरीं लाट;
कळेना जातसे कीं हा फुटोनी छातिचा कोट.
किती मी पांखरावाणी सख्या रे ! पांखडूं प्राण ?
न सोसे या विलंबाचा मनाला वाढता ताण !
क्षणांची वाढते संख्या, दुणावे तीव्र उत्कंठा;
गळयाशीं माप हें आले क्षणीं ये, दे मिठी कंठा !

निराशा हाय येथें ही ! तियेनें दाटला ऊर;
म्हणोनी माझिया गानीं निराशेचे सदा सूर !

२७।३।२२, कराड

## अभिसारिका

गेला पौरजनीं फुलून सगळा—त्या राजमार्गातुनी
घाईनें अभिसारिका चटचटा दाटींतुनी चालली
नौका आक्रमते झराझर जशी फेसाळला सागर
कीं जैशी भ्रमरी प्रफुल्ललतिकापर्णांतरीं वावरे.

नेत्रीं चंचलता, पदीं चपलता, चांचल्य गात्रांतुनी—
वीरांची समरांगणीं असिलता वेगें जणूं चालली.
चाले चोरुन अंग ती, थबकुनी जाई पुन्हा सत्वर,
स्कंधीं सावरुनी धरी पदर—जो आकर्षितो अंतरें.
कोणी एक तशामधें लगबगा गेला तिथें मागुनी
बोले कीं तिज—शुद्ध बुद्ध हरुनी त्याची जिनें घेतली—
'कोणाची प्रतिमा करीं ? बघुं तरि तो भाग्यशाली नर !'
'बाई कांहिं न काळ वेळ' वदली 'हें काय मार्गी बरें !'
जाणाया भवितव्य धीर इतुका त्याला निघावा कसा !
तों त्याच्या वदनासमोर धरि ती हातांतला आरसा.
२२।६।२२, पुणें

## ताजमहाल आणि प्रीति

नाहीं सुंदरता कुठें ? अणुअणू शोभे सबाह्यांतर.
पक्षांचीं धरटीं, हिम, स्फटिक वा पुष्पें, फळें सुंदर.
कोणी मातींत खोदतो निज गृहा शंकूपरी कीटक,
सृष्टीशिल्पकलापटुत्व जरि तें साधें, मनोवेधक.
जेथें शिल्पकलाच एकवटली सौंदर्यसीमा पुरी,
शोभे ताजमहाल भारताहिरा कालिंदितीरावरी.
येते त्यास पहावयास जनता पांचीहि खंडांतुनी,
होते विस्मित; 'धन्य, धन्य' निघती उद्गार तोंडांतुनी.
शोभे तांबुस अंबुजासम अहा ! अस्तोदयीं भानुच्या,
चांदीची प्रतिमाच कीं हिमगिरी कांतीमधें इंदुच्या,
काळोखांत दिसेल अंधुक जरा कीं देवदूतापरी,
तो केव्हांहि कसाहि, कोठुनि पहा; त्याची न कोणा सरी.



[library stamp]

नाहीं तो जरि पाहिला, तरि तुझी प्रीती तशी मानतां,
अंतश्चक्षु नवी नवी अनुभवी सौख्यासवें चारुता.

२६।८।२२, पुणें

## सुधेस

बघ वांकवांकुनी अशीच दारांतून,
हें अर्धं दर्शन मज टाकी मोहून.

ही क्षितिजामागें उषा लाजरी खुलते,
कीं पानामागें कळी मनोहर डुलते,

ही आनंदाची उकळी हृदयांतून,
हुरहूर मधुर कीं उसळे उकळींतून,

कीं लकेर अपुरी कुंजवनांतुनि येई,
कीं इंद्रधनु नभीं क्षणिं येई क्षणिं जाई,

या नानापरिच्या सुंदरतेंतिल गोडी,
उमटली तुझ्या कीं कृतींत थोडी थोडी.

निज ओष्ठसंपुटीं हळुच तर्जनी धरुन
ती तशीच तिरपी नजर लाव चोरुन.

मी उदासवाणा येतां कधिं तव सदनीं
मज फुलवी छकुले! याच लपंडावांनीं!

३०।६।२२, पुणें

## मिळेल कां कधिं?

१

पूर्व-पश्चिमा खळाळांतुनी वाहे जलवाहिनी
'मांडवी' अमुची मंदाकिनी.
दूर डोंगरासमीप अगदीं तीच्या तीरावरी
आमुची जमिन वतनी बरी.

## यशवंत

भरदार शिवारामध्यें पिकें दाटलीं,
उगवत्या भानुची प्रभा नभीं फांकली,
बांधावर गवतें हिरवीं फोंफावलीं,
वनलक्ष्मीचें वैभव अभिनव उतास जणुं चाललें;
खगांनीं तत्स्वागत गायिलें.

२

सृष्टिसतीच्या आनंदाच्या प्रसन्न उत्सवदिनीं
शिवारामधें गात येउनी,
वरुणकृपेचा विलास ऐसा पाहुन मनमोहन
वाटलें चित्तीं मजलागुन--
"कोंपऱ्यावरिल त्या आम्रतरूच्या तळीं
मृदु तृणांकुरांची मखमल--गादी भली
बुंध्यास टेकुनी--चक्रवर्ति जणुं बळी--
भूक लागतां चटणी किंवा कांदा अन् भाकर
खाउनी द्यावी वर ढेंकर.

३

धुमाळ--वाळा जोडी घेउनि मोट धरावी कधीं,
करावी राखण मळणी कधीं;
रास घालुनी डोळे भरुनी संतोषें पाहुनी
निजावें वाकळ मग पसरुनी;
वर चंद्रतारकामंडित तें अंबर,
वाजती गळ्यांतिल बैलांचे घुंगुर.
पायथ्यास पडुनी वाघ्या करि गुर्गुर,
यशवंताला मिळेल कां कधिं कृषिकर्मी राबणें !
नको हें परवशतेचें जिणें !

१२।१२।२३, पुणें

# जलक्रीडा

झोत खालीं आदळे वेगें बळें शीर्षांवरी
विंचरी केशास, निर्मी मोतियांच्या झालरी.
पृष्ठभागीं लोट घेतां फांकुनी दोहींकडे
पंख कांचेचे, तसें विस्तारुनी पाणी पडे.
त्या प्रपाताखालतीं देखूनिया आम्हां नरां,
आमुचा हेवा तुला कां वाटला गंगाधरा !
चंद्रमौळी तूं; कपाळीं आमुच्या इंदू नसे;
आर्द्रतेनें तें परंतू तेविं तेजस्वी दिसे.

कांपलेल्या फत्तरांचे सान मोठे कोंपरे
कीं कराया ठाकले हे मत्त हत्ती मोहरे,
रोखुनी कीं ठेविलेल्या तीक्ष्ण भाल्यांचीं फळें,
क्षुब्ध झाल्या शार्दुलांचे उग्र किंवा ते सुळे.
जागचें पाऊल थोडें हालतां अर्धा तसू
खोल चिंचोळ्या प्रवाहीं मग्न गात्रांनीं असूं.
मृत्युच्या दंष्ट्रा परी भ्यालों न तेथें मोजतां,
तीक्ष्ण साऱ्या तन्नखाग्रीं हांसुनीया नाचतां.

पिंजलेल्या त्या प्रवाहांतून पाणी धांवतां
शुभ्र रत्नांची करी खैरात कोणी देवता.
रूप गारांचें धरी पाणी उशी येतां झणीं,
अंबरींच्या झुंबराचे सांडले किंवा मणी.
धांवतां खाचांतुनी फेंसाळलें सारें कसें
कीं दह्याच्या मंथनीं लोणी जमोनी येतसे.
कीं चमेलीच्या फुलांचे वाहती हे पुंजके,
हाय ! येथें सौख्य सारें सेवणें हें मोजकें !

२३।१।२३, पुणें

# चिमुकल्या वसंतास

"उगि उगि रे बाळा वसंता! किती रडायाचें!"
हेतु कसे मनिंचे कळावे मुक्या वसंताचे!
भुरक्या रंगाचें कपाळीं जावळ भुरभुरतें,
सुंदरशी टिकली मधोमध त्यांतुनि चमचमते.
मुठी झांकलेल्या, मनगट्या मणिबंधीं खुलती;
कंठ जया फुटला राघुची मान दिसे जणुं ती.
'घे बाळा हातीं खुळखुळा;'–छे, गळला खालीं;
दृष्टि वसंताची मनगटीवरती परि खिळली.
डबडबले डोळे अश्रुंनीं, बिंदु तसे गालीं,
परि एकाएकीं थांबलें रडणें त्या काळीं.
'ओढओढुनी ती पाहशी हातिं घ्यावयास;
जिवापाड करसी आपुली शिकस्त सायास.
येईना हातीं परंतु,–जरि आटोक्यांत;
जादुगिरीचा या पडेना उमगहि डोक्यांत.
फिरफिरुनी झटसी, त्रासती, कंटाळुनि जासी;
गंगा–यमुनांच्या पुन्हा ये भरती ओघासी.'
यत्न यथाशक्ती चालतो दुबळ्या जीवांचा
समजुतिवांचूनी खळेना ओघळ अश्रूंचा!

"उगि, उगि रे चिमण्या, वसंता! किती रडायाचें!"
हेतु कसे मनिंचे कळावे बाल वसंताचे!

१६।२।२३, पुणें

# विश्वाची रमणीयता

काव्यग्रंथ जिथें तिथें, नच रितें होतें उसें पायसें
सारी चाखुनि पाहिली भरभरा जी त्यांत गोडी असे.

झाली तृप्ति न कांहिंही, परि वृथा कष्टामुळें भागलों,
रम्यत्वा हुडकावयास उठुनी चालावया लागलों.
पूर्वा सस्मित देखिली, स्मितमुखी पुष्पें बगीचांतलीं,
हातीं घेउनि हुंगिलीं, दसविलीं वक्षीं, क्षणीं फेंकिलीं.
गाणीं निर्झरसंगतींत म्हटलीं, वृत्ती न संतोषली.
वारा, पाउस, इंद्रचाप—सगळीं हीं नाटकी वाटलीं.
सारीं फोलकटें, नटे वरिवरी जें जें जगीं गोमटें,
अंतःशांति मिळे जयाकडुनि ना तें तें गमे ओखटें.
माझ्या कां नशिबीं असेंच लिहिलें रानीं वनीं हिंडणें ?
केल्या कांहिं, न हातिं जें गवसतें तें सारखें धुंडणें ?

आलों श्रांत मनें पदें परतुनी, गेहीं रमा देखिली;
'विश्वाची रमणीयताच रमणी' ही गोष्ट रेखाटली.

२८।३।२३, पुणें

## श्रीशिवरायास

राष्ट्राचा इतिहास कोंवि घडला ? ते कोण वीराग्रणी ?
राष्ट्राचें भवितव्य कोण घडवी ? प्रश्नावली लोचनीं—
राहे येउनि ही उभी; फिरवितों दृष्टी सभोंवार, तों—
देखावे दिसती मनोज्ञ, सहजीं हा जीव वेडावतो.
धर्मांची भगवी ध्वजा नित जिथें वायूंत हेलावली
ती सह्याद्रिशिरीं अझूनि दिसते दुर्लंघ्य दुर्गावली.
आतां अंबरिं तीचिया चमकती माथ्यावरी तारका
सर्वांठायिं तुझी सुमूर्ति दिसते राया ! मनोहारिका.
आम्हां का मिळला न जन्म तव त्या स्वातंत्र्यकाळामधीं
ऐसा येइ विचार तों;—न सहतां हा वर्तमानावधी.

नांवाचा जयघोष हा कृतिविना; वाचाळता माजली.
अश्रूंचा तुज आज राष्ट्रपुरुषा ! हा घे निवापांजली.

आम्हांला जरि लाभतील कणिका त्वत्शौर्यसिंधूंतल्या
पायींच्या जड शृंखला झडकरी होतील कांहीं ढिल्या.

२५।४।२३, पुणें

## खलांनों

खलांच्या अंतरंगाचा मला ठावाच देखावा
उरीं ज्वालामुखी पेटे, कढे पोटामधें लाव्हा.
जिभेच्या अग्रभागाला मधाचीं मोहळें मोठीं,
परंतू डोंब आगीचा तयांच्या पेटतो पोटीं.
दुधाच्या देखुनी धारा तयांना चीक शेराचा
म्हणोनी सांगण्यासाठीं भजे यांची खुनी वाचा.
सुखाच्या पूर्णचंद्रानें जिथें फेसाळतो सिंधू
तिथें हे टाकुनी देती विषाचा नेमका बिंदू.
विराजे अंगणीं कोठें जरी कोजागरी रात्र
तिथें घूत्कार घालाया क्षणार्धीं टाकती मात्र.

रचा हो धूर्त दुष्टांनों! कसाही व्यूह जंजाल;
तया उल्लंघुनी जाया अम्हांला पंख पाहाल.
कसाही चालवा मारा, उभा !–पावे न मी ढाळ,
न भंगे वज्रसंपातें शिरीं जी आमुच्या ढाल.
प्रवासीं आमुच्या ठेवा खलांनो, मांडुनी लोडें;
अडायाचें पडायाचें न तेथें आमुचें घोडें.
करा हो दुष्ट हेतूनें विषाची सारखी वृष्टी
विषानें शुद्ध भावाची जळोनी जाइना सृष्टी.

विषारी वाफ सोडोनी भरा दुष्कीर्तिचा धूर
अम्हां वाटे फुलेलाचा वियद्गंगेस हा पूर.
कितीही तीव्र आगीचा मुखावाटे निघो लोट
कृपेचा भोंवतालींचा जळोनी जाइना कोट
अम्हांला चिलूखतासाठीं त्वचा प्रल्हाद–बाळाची;
कशा रूपांतही येवो अम्हां भीती न काळाची.
खलांनो! चालवा जिव्हा! जिव्हारीं भोसका बाण!
खलांचे घाव झेलाया असें मीं मांडिलें ठाण!

११।८।२३, पुणें

# प्रेमाची दौलत

ही तुझीच वाकळ म्हणुनि मला लै प्यारी
प्रेमाची आवड समद्याहुनि रे न्यारी!
झालींत लक्तरं तरीहि मजला गोड
[ पुरवितें प्रेम पाहिजेल त्याचें कोड ]
ही तुझीच थाळी म्हणुनि चाटते राया!
मज लागिर झालं म्हणती आयाबाया,
हा तुझाच पावा, मोरवेलिची काठी
झोपतें घेउनी रोजच पोटीं–पाठीं.
हें तुझ्या डोइचं जुनं जरी मुंडासं
कुरवाळित बसतें, होतं माझं हांसं!
हें तुझ्या अंगचं जपुनि ठेविलं कुडतं
ही दौलत माझी;– वेडच त्याचं जडतं!
    मांझिया कोण जो पोटीं येइल
    तो जवा बापई म्होरं होइल
हें घालुन त्याला पाहिन डोळे भरुनी
मग खुशाल तिरडी बांधा माझी कोणी!

१।९।२३, येरवडा

# कर्तव्य आणि कर्म

चाले नांगर, फाळ खोल घुसुनी आलीं वरी ढेकळें,
धोंडे वेंचुनि सर्व शेत अगदीं केलें तणावेगळें;
एका शेतकऱ्यास तों गवसले हंडे भले थोरले,
घेतां काढुनि झांकणें, झळकलीं रत्नें हिरे त्यांतले.
ऐशा दंतकथा कथेकरि किती वाखाणती कीर्तनीं,
थोतांडें गमतीं मला, नच सुधी जाई तयां भाळुनी.
भोळ्या शेतकऱ्या ! नको भुलुं तयां, तथ्यांश घे जाणुनी;
भूमी नांगरतां पिकें उगवतीं जोमामधें वाढुनी.
ही साधीच कथा परंतु तुजला साधेपणानें जर
सांगावी तर घालशील न गड्या ! शेतांत तूं नांगर.
कर्मासक्ति ढळूं नये म्हणुनि हीं भोळ्या जनां आमिषें;
काळानें सगळीं कधींच लिहुनी ठेवीयलीं ज्योतिषें !

मीही शेतकरी असें, सकल हा संसार शेतापरी—
काळी माति न ज्यांत एक कणही, चारीहि सीमांवरी
दैवाचे वरचेवरी भडकती ज्वालामुखी डोंगर,
स्फोटांतून तयांचिया पसरले लाव्हारसाचे थर.
झालीं फोलकटेंच बीं किडुन हें, शेतांत तें पेरुन—
हातीं काय तरी मला गवसणें ?—होणार आवर्षण !
मत्क्षेत्रीं नच लाभ रत्ननिधिचा हें जाणतों मी मनीं
रत्नें होतिल कोळसे मम करस्पर्शामुळें तत्क्षणीं !
हातीं नांगरखुंटिला धरुन मी क्षेत्रीं परी कष्टतों
कर्तव्यास्तव कर्म आचरुनि हें कष्टी जिणें कंठतों !

२।११।२३, येरवडा

# बाळपण

देवा ! बाळपणांतले दिन मला दावी अशी मागणी
चाले कंठरवें; प्रभो ! मज नसे त्याची परी मोहिनी.
होतां दुःखद वर्तमान, फिरुनी भूताकडे पाहणें,
भावी काळपटावरी नव मनोराज्यींहि वा आंखणें,
कर्तृत्वीं दुबळे कुणी ठरति जे त्यांचा मनोधर्म हा.
भावी काळ नसे मुठींत म्हणुनी ही त्यांस बाल्यस्पृहा.
गेलेलें न मिळे ! स्वयें मिळविणें सामर्थ्ययोगें तरी
कीं जें ध्येय धुक्यामधें दडुनिया राहे अंततोदरीं
हें सामर्थ्य यदीय तो कधिं तरी वांछील कां शैशव ?
दौर्बल्यें नच शैशवास उरलें स्वातंत्र्य वा वैभव !
येतां बाळपणा पडेल पदरीं ती बाळबुद्धी पुन्हा;
त्या बुद्धीमधिं दृग्विलास न परी या विश्वसंवीक्षणा.

कर्तृत्वीं परि पापमार्ग वरिला अन् सारखी जाणिव
त्याची टोंचत राहतां, स्तविन मी "देई प्रभो ! शैशव"
२९।१२।२३, येरवडा

# कोणाचे आम्ही कोण ?

कोणाचे आम्ही कोण ? आम्हि जगाचे दिक्कोन !
ब्रह्मांडहि बाहूंमाजी धरणारे आम्ही गाजी !
ब्रह्मांडाभंवती बुरुज हे दंडचि अमुचे उमज !
ब्रह्माण्डाभंवती वेढे घालीं जें भोळें वेडें—
तें आम्हिच अंजनिबाळ; काळाला झालों काळ !
त्या युगांत तो अवतार; नवयुगीं हा नव शृंगार.
मांडियलें आम्हीं ठाण जगदुद्धारास्तव जाण !

२

ही पूजा अमुची आम्ही मांडितसूं, परि मनधार्मी !
व्यापारी विश्वच बनलें आम्हांला मोल न उरलें.
जगताच्या बाजारांत कोंडयाहुनि आम्ही स्वस्त.
मग पाहा 'आम्ही कोण ?–' शून्यामधिं मोठें शून्य !

३

कोणावरि रागेजावें मग आम्ही निर्मळ भावें ?
'प्रेमाच्या गांवा जावें' मग म्हणती रागेजावें.
प्रेमाचें ठाणच उठलें; कोण कुणाचें मग कुठलें ?
प्रेमाची वसती नसतां कोणावर फुगतां रुसतां ?
देवघेव कांटेतोल प्रेम त्यांत पुरलें खोल.
हेंच दिसे जिकडे जावें; कोणावर रागेजावें ?

४

कवटाळुनि ज्यांना त्यांना मानियलें 'दादा–नाना'
" हे सारे अमुचे भाऊ; या एक्या ताटीं जेऊं "
माधुकरी मागुनि यावें जेवाया यांना द्यावें.
परि सारे भोजनभाऊ ! स्वार्थसाधु केवळ काऊ !

५

कोणावर रागेजावें ! नशिबानें द्यावें घ्यावें !
लावावा कोणा बोल ! भाग्यलेख अमुचा फोल !
द्या सर्वस्वाचा साज; मागावें परि ना व्याज !
असल्या व्यवहारामाजी मित्र–आप्त सारे राजी.
साधाया केवळ स्वार्थ आणभाक देती व्यर्थ.

६

वचनांच्या बरसातींत वाटल्यास व्हावें तृप्त.
बोलाचा शिजला भात त्यावरती मारा हात.

वचनांच्या फुलल्या वेली त्यांत करा मानसकेली.
वचनांचीं नक्षत्रें हीं मोदानें दुरुनी पाही.
वचनांचें माणिकमोती कागदीच टिकल्या ठरती.
तीं वचनें केवळ गारा; चिमटींतील किंवा पारा.
वचनांच्या वाऱ्यावरती जीवाच्या नावा तरती
वचनांची धरुनी आशा आशेच्या नाजुक पाशा
गुंडाळा देहाभंवतीं, निष्फळता ये परि हातीं !

७

आशेची तरते होडी, आशेची खोटी गोडी.
आशेवर होणें स्वार— कायमचें होणें ठार.
आशेची घोडा-गाडी— पायाविण जणुं ही माडी.
मातीचे बैंदुरबैल शेत कसें नांगरतील ?
वचनांची ज्यांना आशा विषपत्रावरि ते माशा.
पृथ्वीच्या चित्रावरती बसणारा गणणें नृपति.
वचनांवरि विश्वसणारा वाऱ्यावरि तो जगणारा !

८

साधाया केवळ स्वार्थ हातिं हात देती आप्त.
आप्तांचें अमुच्या दैन्य वाढवितें अमुचें दैन्य.
मित्रांची अमुच्या फौज मग बघते दुरुनी मौज.
आप्तलोक अमुचे सारे पृथ्वीवरि वावरणारे.
आम्हांला जगण्यासाठीं वाव नसे पृथ्वीपाठीं.
आप्तगोत व्हाया अमुचें हृदय रक्त ना एकाचें !

९

कोणाचे आम्ही कोण ? शब्दांमधिं आम्ही 'होन.'
परि आम्हि न चलनी नाणें; शिवराई-मोलें जाणें.
देव्हारे अमुचे जगतीं माजतील मेल्यावरती.

उभारुनी दगडी पुतळे नाचतील पुढती सगळे.
भंवतालीं धरितिल फेर; आज परी करती जेर.
वाभाडे काढायाला वाघनखें तीं हाताला.
रडकुंडी आला जीव; यांतुनि देवा! वांचीव!

१०

आम्हांला मानुनि चोर चोरांना गणती थोर.
परक्यांचें कौतुक करती; तुच्छताच आम्हांवरती.
परक्यांना मलिदा देती; परि कळणा अमुच्या पात्रीं.
पापाला दोषी आम्ही; पुण्य घेति अपुल्या कामीं.
विपदेला मालक आम्ही; धनधान्या परि ते स्वामी!

११

बाबांनो! कां रे ऐसें? नुमजाना कोणा कैसें?
कोणावरि तुमच्या गमजा? विवेक चित्तीं हा समजा.
रक्ताश्रूंवरती अमुच्या या गाद्यागिरद्या तुमच्या.
पायांमधिं अमुचीं हाडें म्हणुनी हे तुमचे वाडे.
सांडियला आम्ही घाम म्हणुनि तुम्हां मौक्तिकदाम.
आमुचिया निश्वासांनीं जगतांतिल गेल्या घाणी
आमुचिया उद्गारांनीं दावियल्या चित्सुखखाणी.

१२

उमजुनि हें चित्तीं पुरतें अवमाना आम्हां परतें!
परि झांकुनि डोळे, लाथा देउं नका अमुच्या माथां.
जरि जाणिव ही ठेवाल मग आम्ही सोसूं हाल!
कोटि योनि मार्गीं तुमच्या पायघड्या घालूं तनुच्या!
परि 'आहों आम्ही कोण?' हेंच कथावें लागो न!

२८।१२।२२, कराड

# गिरीश

## जागेपणचें स्वप्न

तुझि ग फुलवेल । त्या अंब्यावरति फुलेल

भोंवतालची खणुनी माती
निर्मल पाणी शिंपुनि हातीं
वेल चढविशी ही तरुवरती
रमुनि किति वेळ ॥ त्या० ॥

अचल लाविसी त्यावर दृष्टी !
ठरली आतां ! विरली सृष्टी ! !
अतां अश्रुची हसरी वृष्टी—
होइ का, बोल ? ॥ त्या० ॥

खळींत गालीं भरले सागर !
कांटा कसला त्यावर थरथर !
लाटांवरती लाटा भरभर
उठति कां, बोल ? ॥ त्या० ॥

दचकलीस कां ? दिसलें कांहीं ?
अचल दृष्टि कां चळली बाई ?
हसऱ्या गालीं लाली येई—
कशाचि ग, बोल ? ॥ त्या० ॥

उघड्या डोळां स्वप्न कशाचें ?
चित्र कोणत्या तरुवेलींचें—
मधुर कोणत्या भावि कालचें—
पाहिलें ग बोल ? ॥ त्या० ॥

जुलै १९२१, पुणें

## नरकचतुर्दशी

आली शारदसुंदरी सजुनिया; वाहून आलापिती—
  ओढे मंजुळ गायनें खळखळा; हांसे वनश्री मुदें;
काढी शेतकरी खडा सुर; पिकें वाऱ्यावरी डोलतीं;
  आनंदें जग डोलतें—नच कळे, मंदावतीं कां पदें !
पेठा पत्तनिं शोभिवंत खुलती शृंगारलेल्या कुणी,
  रांगोळी, बिजली, कुठें तजविरा, कुंड्या, फुलें तोरणें;
ही रस्त्यांतुन धामधूम विलसे दीपावलीच्या सणीं,
  कोठें गात सुखी रमे जग;—परी, गे काय वाटे उणें ?
स्वच्छंदी फुलपांखरें बिलगतीं हांसून, येतां घरीं,
  डोळे सूचक, मूक भाव वदती—'आली दिवाळी' असे,
गालीं रंग तरंगती, वच जणों ! हृश्यें किती हांसरीं !
  डोळ्याला गत वर्ष—हाय ! दिसतां लागे जिवाला पिसें !

'बापू' अंतरले म्हणून नयनीं माझ्या जळें दाटलीं !
'आई' अंतरली म्हणून तव गे प्रेमासवें गोठलीं ! !

१९।१०।२२, पुणें

## मैत्रीचें सिंहावलोकन

तेव्हां रम्य उषा ! जरा उमलली कोठें जिवाची कळी;
  होती स्वैर कुठें नभांत फिरुनी चंडोल हीं मानसें;
वारा गोड; सुरम्य रंग नभिंचे पाहून गालीं खळी—
  बाल्याची हंसरी पडे; मन जडे; सौख्यास सीमा नसे
मध्यान्हीं रवि तापला ! क्षणभरी दूरावलों आपण;
  गोडी लोपुनि जाय ! होरपळलों खातां लपेटा किती !

लागे आंच जिवास; किल्मिष जळे चित्तांतलें 'मीपण;'
देहीं दूर परी मनें मिळतसूं येऊन वाऱ्यागती
होती रात्र पुढें भयाण, कळलें नाहीं जिवा हें जरा
आले मेघ गडाडुनी ! कडकडे विद्युल्लता—वादळ !
गेले तुंबळ अंबुधी खवळुनी ! भिंगोनि गेली धरा !
दों टोंकास परंतु पाहत उभे होतों किती निश्चळ !

दुर्दैवी सरली निशा; विमलता पूर्णत्व दे प्रीतिला;
येई दिव्य उषा; उषामय पुढें रस्ता असे आपुला
५।१०।२२, पुणें

# विसरलेला नमस्कार

जातांना चरणावरी शिर तुझ्या ठेवीन हें योजिलें
आली वेळ, वियोगदुःख मनिंचें कंठामधें सांठलें;
अंधारीं सरली समोरुन तुझी चारित्र्य-चित्रावली,
कांहीं आणिक थोरवी मज तुझ्याठायीं दिसू लागली
लोपोनी भगिनीपणा जननिची आली तुला श्रेष्ठता,
होतों तेथ उभे तसेच—गमलें 'तूं माय, मी बालक';
'आईचें कविगीत' कर्णिं घुमलें ! होई मना पोषक
वाढे थोरपणा क्षणांत गमलें झालीस तूं देवता
ये दिव्यत्व; विराजलीं शिरिं तुझ्या तीं वैभवें स्वर्गिंचीं
दिक्काला तव दृष्टि व्यापुनि उरे, तेजावली फांकली
अश्रूंनीं भिजलीं जगें ! न करवे व्याप्ती तुझ्या मूर्तिंची
झालों लीन ! समाधि अंतरिं अशा दृश्यामधें लागली

होतों सान, परंतु ये तुजमुळें किंचित् मला थोरवी
देवी ! भक्त म्हणून वंदि तुज मी बंधू अशा वैभवीं
२३।१०।२२, पुणें

# शांतिस्थान

एकच शांतिस्थान । मला तूं । एकच शांतिस्थान

सभोंवार रानें हिरवळलीं
गंधानें शेतें दरवळलीं
जळें ओहळांतुनि खळखळलीं
विंझणवारे वंशतरूंतुन गाती मंजुळ गान

खडक बाजुला विशाळ सुंदर
खालीं ओबडधोबड फत्तर
कपारींत हीं झुडुपें वरवर
शुभ्र लाल या तटीं कण्हेरी डुलती लववुनि मान

गवतुन गेल्या काळ्या डगरी
एक झोपडी ही उंचावरि
पलीकडे त्या माझी नगरी
फुले फुलोरा मीच फुलारी, हा माझा अभिमान

उत्तरेस डोंगर 'चंद्रागिरि'
समोर पूर्वेला 'अंभेरी'
दक्षिण बाजू अफाट सारी
पश्चिम झाडीमधून दिसती शुभ्र घुमट हे छान

पलीकडे कृष्णा खोऱ्यांतुन
अजिंक्यताऱ्याच्या शेजारुन
मुरडत जाते वळसा घेउन
अंतर्लोचन इथून बघती प्रदेश पुढले सान

नील क्षितिजीं अंधुक टोकें
किरणानें चमकता हीरकें
सह्याद्रीचीं म्हणती नाकें
मूर्तिमंत मज इतिहासाचें दिसतें पुढती पान



मराठी ग्रंथ संग्रहालय आवक नं. ९८ ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ठाणे.

उंच 'जरंडा' वायव्येला
धर्माच्या फडकवी ध्वजेला
जवळुन खालीं रस्ता गेला—
प्रियमित्राच्या गांवा वळणें घेउनि रानोरान

दृष्टी सौंदर्यानें भरते
जीवनकलहाशा मग मरते
दिव्यांतुन अंतर गिरगिरतें
एकान्तीं या जरा बैसतां, नुरे जिवाचें भान

संसारांतिल भेसुर चिंता
जाळिति अंतर जातां येतां
इथेंच पावे मन तन्मयता
स्वर्ग आमुच्या तूं नगरीचा--केवळ तूं मत्प्राण

सन्मार्गानें कष्ट करोनी
भल्याबुऱ्याचे शाप घेउनी
अल्पपणें भूमाता सेवुनि
एक दिनीं तरि जग विसरावें, होउनिया रममाण

आजवरी जीं लिहिलीं गाणीं
यावें येथें तींच घेउनी
ओहळासवें सूर धरोनी
श्रोता गायक मीच होउनी, एकच ध्यावें ध्यान

किंवा माझ्या प्रिय शंकरला
किंवा माझ्या प्रिय ताईला
किंवा माझ्या जीवसखीला
घेउनि, गोष्टी इथें कराव्या, करुनि सुखामृतपान

२५६०

स्वर्ग कोणता याहुनि दुसरा
विरंगुळा तूं—तूंच आसरा
विश्रांतीचा तूं एक झरा
असेच खेळीमेळीं होऊं एक, गाउनी गान

२५।८।२३, रहिमतपूर

## गोड आठवण

ठेविलें दारीं न जों पाऊल तुझ्या, मंजुले!
गोड गाणें ऐकिलें, जें तूं स्वतांशीं गुंजिलें

पाठमोरी बैसुनी बागेमधें तूं अंगणीं
आपुल्याशीं रंगशी,—होतें जरासें सांजलें
गुल्मुशीचा हार हातीं झरझरा गे गुंफुनी
सांवरोनी अंचळातें वायुला तूं शासिलें
नारळी रंगांत शोभे, रेशमी पाटीवरी,—
शुभ्रता आंतील किंचित्; रंग रंगानें खुले
सैल अंबाड्यावरी शोभे कडेची लोकर
कीं सुरंगी इंद्रचापा कृष्णमेघीं निर्मिलें?
गांठल्या केसांवरी गे पाच मर्वा घालुनी
सोनचाफ्याचें टपोरें फूल होतें खोविलें
थांबलों—निःशब्द गेलों—सन्निधीं ठेलों जरा
मोहनी घालून कोणी गे कळेना ओढिलें
रंगलें गाणें! लकेरीसंगती मी गुंगलों
मोडवेना त्वत्समाधी—त्या सुरांनीं मोहिलें
'गुंफितांना हार, गावें तूं असें गोड स्वरें

चोरुनी ऐकून मींही गे रमावें–' वाटलें
तोंच आली हांक–गानाची समाधी भंगली !
नीट तूं गेलीस–मागें ढुंकुनी ना पाहिलें

गुंफतांना सांडलेलीं वेंचिलीं हातीं फुलें
तींच आतां हुंगतांना अंतर प्रेमें उलें

२८।८।२३, पुणें

## शनवारवाडा

–१–

तुझ्या विछिन्न रूपाला बघोनी फाटतो ऊर
हळाळे जीव; अश्रूंचा स्मृतींनीं दाटतो पूर
तटांच्या भंगल्या भिंती, फुटोनी चौथरा गेला
जळालीं वैभवें सारीं, निमाले छातिचे शूर
इथें तल्वार बाजीची विराजे मस्त, रंगेल
इथें झेंडा मराठ्यांचा उडे वाऱ्यावरी स्वैर
हिरीरी वीर भाऊची, मनींचा त्वेष चेतून,
हटानें नाचवी घोडे, कुरुक्षेत्रांत चौखूर
अरीला कांपवी भीती; इथोनी माधवी नीती–
पुकारी पेशवाईचा दरारा भारतीं दूर
विखारी गारदी घाला,–निखारे मत्सराग्नीचे
विचारी युक्तिनीं सारें जहालें शांत काहूर

मराठेशाहिच्या–मागें जरा होती तुझी आस
निमालीं 'शाहसूनूचीं' परी ध्येयें महामूर ! !

–२–

सभोंती फुर्फुरे घोडा,, झुलावे हत्ति दारांत,
तिथें कां रान माजावें ? कुठें तो वैभवी नूर !

फवारोनी जिथें धारा रुपेरी सांडले बिंदू
तिथें हा 'पद्मकारंजीं' विटांचा कोरडा चूर
मऱ्हाठी शूर मर्दांचे पवाडे गाइलीं वाणी
घुकारावें दिवाभीतें तिथें कां काढुनी सूर
खरावें काय जोत्यांनीं फुटूनी, काळवंडूनी
कड्यांनीं—हाय ! गंजावें ! दिसावें रूप भेसूर !
तृणांची लाट ही हाले; कुणाचे शूर रोमांच ?
रणींच्या त्याच जीवांची असे वा काय हुर्हूर ?
स्मृतीनें पाहणें आतां मऱ्हाठी तेज वा वाणी
नको गे कल्पने धावूं; बरें होणें मनीं चूर

कुणाला नांव ठेवावें ! नशीबा लावणें हात !
कुठें कोणाकडे पाहूं !! निराशे जीव आतूर !!

२९।८।२३, पुणें

## विश्रामबागेजवळ--

कुठें आम्ही चाललों ? वरी ? खालीं—?
काय अमुची जाणीव अम्हां झाली ?
उंच बाजूला न्यायमंदिरें हीं,
कळस सोन्याचे;— आंत काय होई ?
बंधु बंधूचें रुधिर चाटिताहे;
किती दीनांचा अश्रुपूर वाहे !
अम्ही अन्याला घेउनी घरांत,
एक वैशास्तव भांडतों मजेंत !
इथें बोलाला मोल कोण आलें !
इथें जीवा पारखे जीव झाले !

गळा दाबुनि मारितों अनाथाला
बुद्धि योजुनि सत्य तें लपविण्याला
–आणि इकडे या मोडक्या घरांत
स्वार्थ होमुनि कुणि धीर बंधु शांत
दीन भगिनींना घेउनी सभोंती
सुधा ज्ञानाची गरीबींत देती.
रुधिर वाहे बाजूस या भयाण,
आणि इकडे हें अश्रुचेंच रान;
इथें गर्दी–खळखळे द्रव्य सारें,
आणि यांना अश्रूच मात्र खारे;
इथें सोन्याचा धूर निघत आहे
आणि यांना ढुंकून कुणि न पाहे!
हाय! कळवळुनी, हृदय फुटे आंत!
'कुठें जातों?'– मग पुसें मी मनांत.

१८।१।२४, पुणें

## गोपाळ कृष्ण गोखले

धीरोदात्त तुझी अजून हसरी मूर्ती पुढें खेळते
तें बुद्धिप्रभलोचनांतिल दिसे औदार्य आकर्षक,
ती गंभीर सहिष्णुता, वदनिंची शांती मनोदर्शक,
तो मंजुध्वनि वाक्प्रवाह,–हृदयीं सारें उभें राहतें
त्वन्मानव्य अगाध! नित्य रमलें देशैकभावें मन,
"राष्ट्रांच्या प्रगतींत पाउल पुढें केव्हां पडे हिंदवी"–
या चिंतेंत जळून, दूर करण्या दुःखें तशी यादवी
सोशी घाव अघोर ऐरणिवरी, घ्यायास तेजःकण

होतें व्याकुळ चित्त! बांधव तुझ्या दारीं तदा पातले!
अश्रूंनीं हंसरें कलेवर तुझें ते न्हाणुनीं वंदिती;
कार्यामाजिं तुझ्या अलौकिक असें देवत्व ते पाहती;
तें हृन्मंदिरिं सांठवून, सुमनीं त्यांनीं तुला पूजिलें

दृश्यादृश्यकणांत हें प्रगतिचें चैतन्य आलोकितों
अन् मी भारतसेवका! तुज मनोभावें नमस्कारितों

१०।२।२४, पुणें

## सप्तर्षि

शुक्राची नव हेमकान्ति खुलते अस्ताचलीं मोहक,
विद्युद्दीप कितीतरी पटपटा हें लागती अंबरीं,
नाचे हें मृग मस्तकीं; यमपथीं शोभे अगस्ती; परी—
माझी दृष्टि तुझ्यावरीच, न कळे, कां लोभुनी थांबते
जेव्हां तूं गगनांत हांसत असा सायंतनीं नाचसी,
मध्यान्हीस कधीं प्रभातसमयीं ये पुंज किंवा वरी,
चक्राकार गती ध्रुवाभंवतिची ऐशी तुझी पाहुनी,
माझें चित्त रमे भुलून; नयना जादू अशी मोहवी
मैत्री अंतरिंची अम्हांतिल, तुला न्याहाळितां कौतुकें,
'आम्ही सात तुझ्यापरी' म्हणुनिया लागे तुळाया तुशीं;
आम्ही सात मिळून फेर धरितों ध्येयासभोंतीं असे,
ऐसें आंतर हेतु साम्य बघुनी चित्तास आकर्षिती

होवो साम्य खरें न वा; परि अम्हां तूझ्यापरी निश्चळ
विश्वीं जें ध्रुव तेंच लाभुन, मिळो निष्कामतेचें बळ

२।४।२४, पुणें

# गजानन त्र्यंबक माडखोलकर

## एक प्रसंग

उभीं हिरवीं शेतांत पिकें होतीं
आस गरिबांच्या नाचतसे चित्तीं;
कोप दैवाचा तोंच अहा, झाला
पुढें जाळित दुर्भिक्ष काळ आला.

लोक अन्ना मोताद सर्व झाले,
शेतकरि ते अन्नान्न करित मेले,
घांस नाहीं खाण्यास गुरें मेलीं,
अवकळा त्या खेड्यास किसे आली.

आठ दिवशीं बाजार भरे तेथें
धान्य देशाहुनि खरेदीस येतें;
जोंधळ्याचे घातले तिथें ढीग
माणसांची लागली एक रीघ.

धनिक सरसावुनि कसा तिथें आले
खरेदीचें कामही सुरू झालें.
गुरें विकुनी आपुलीं कसायाला
धान्य घ्याया हा गरिब लोक आला.

वखारीचें पाहुनी तिथें दार
उभी होती राहिली एक पोर;
सान होती ती पोर अंत्यजाची
बालभावाची मधुर मूर्ति तीची.

प्राण होते डोळ्यांत तिचे आले,
आसवांनीं जाहले गाल ओले;

अशी तेथें ती पोर अंत्यजाची
उभी करुणा भाकींत त्या जनांचीः—

"घरीं चिमण्या खेळती ज्या अनेक
पोर तुमची मी त्यांत असे एक,
तुम्ही दादा, आधार अनाथाला
जोंधळ्याची मज मूठ एक घाला.

घरीं भावंडें चार अम्ही सार्नी
माय गेली टाकून अम्हां रार्नी;
तुम्ही दादा, आधार अनाथांचे,
चोज पुरवा पोरक्या पाडसांचें.

घरीं बाळें आहेत भुकेलीं हो,
हाच त्यांच्या चित्तास एक लाहोः—
अतां अमुची येईल घरीं ताई,
हसुनि चुंबिल देईल गोड कांहीं.

देह माझा हा इथें उभा आहे,
जीव माझा त्या जिवलगांसि पाहे;
तुम्ही दादा, आधार अनाथाला
जोंधळ्याची मज मूठ एक घाला."

अशी बोलत ती उभी करुणवाणी,
लोचनांनीं गाळीत तिथें पाणी;
एक आला तों धनिक विप्र तेथें,
पाय धरुनी विनाविलें तिनें त्यातें.

महाराचा स्पर्श तो ब्राह्मणाला
सहन नाहीं क्षणभरहि त्यास झाला,
लाथ मारुनि चांडाळ पुढें गेला,
दाखवुनि तो मृत्युचें दार तीला.

२१।११।१७, मुंबई

# भगवा झेंडा

शिवप्रभूच्या स्वातंत्र्याचा हा भगवा झेंडा!
श्रीमंतांच्या शौर्यश्रीचा हा भगवा झेंडा!
संतकवींच्या सायुज्याचा हा भगवा झेंडा!
वागीशांच्या वाग्विभवाचा हा भगवा झेंडा!
पतिव्रतांच्या पुण्याईचा हा परमोद्रेक!
जुलमावरती स्वातंत्र्याची ही भालाफेंक!
सत्याचा निर्घृण काळाला हा शाश्वत धाक!
कर्तव्याची, भवितव्याची ही भेदक हांक!
'पौरुष करितें दुर्बलघातक दैवावरि मात'
या तत्त्वाची याद जागती ही झुलते येथ!
स्वातंत्र्यास्तव लढतां लढतां जे गारद झाले
रणसिंहांच्या हृदयांतुनि त्या उसळुनि वर आलें—
चैतन्यासह जनसेवेचें मंगल जें ध्येय
मूर्तरूप तें गगनवितानीं हेलावे काय?
राष्ट्रोद्बोधक ऊर्जस्वल संदेश समर्थांचे
जागवीत ते किंवा ध्वज हा वाऱ्यावर नाचे?
सहज नभीं हा स्वातंत्र्यध्वज जेव्हां आंदोले
अभिमानानें राष्ट्रतेज हें वाटतसे डोले!
या राष्ट्राचें परम तेज हें जगतीं थडकूं दे!
भगवा झेंडा वातावरणीं अविरत फडकूं दे!

२३।१२।१९, मुंबई

# कालचा महाराष्ट्र

" राज्य त्यागुनि जे वनांत दडले होते शकांच्या भयें
झाले भेकड दाक्षिणात्य नृप ते उन्मत्त आतां जयें;
होते चिंतित काल कोण अमुचें वारील हें सांकडें
झाले क्षत्रप नष्ट आज म्हणुनी उन्माद यांना चढे !
लीलेनें जरि दाक्षिणापथ तुम्ही केलात निष्कंटक,
नाहीं सर्वच भूतलावरिल ते निःशेष झाले शक;
ज्याची खड्गलता रणीं चमकतां विद्युल्लता लोपते,
आला, श्रीशकचक्रवर्ति सहसा तो आज आला इथें !
झालें उत्तर जिंकितां अखिल ज्या निर्वीरमुर्वीतल,
आलें गर्जत उत्तरेकडुनि तें वेगें शकांचें बळ;
आतां वारिल कोण संकट महाराष्ट्रा ! तुझें हें पुन्हा ?
चित्तीं तूं शरणागतीविण दुजी आणूं नको कल्पना !
आंध्रांचा म्हणतात भृत्य तुजला,—आतां शकांचा उद्यां
" तूं होशीलच भृत्य वाहवुनि वा या शोणिताच्या नद्या ! "
आले घालित धाक हा शक जरी, झाला न त्यांना वश;
केला संगर शालिवाहननृपें, नेलें दिगंता यश.
स्फूर्ती अद्‌भुत संचरे क्षणभरी लोकांचिया अंतरीं
आला पाहुनि हा भयप्रद पुन्हा घाला स्वदेशावरी;
झाल्या जागृत वीरवृत्ति अवघ्या, चैतन्य तें संचरे
निष्प्राणांतहि,—हें चराचर तदा स्वातंत्र्यतेजें स्फुरे !

*        *        *

लाटांची घनघोर फेर जरि ही क्षुब्धार्णवाची झडे
झाले हे न कदापि कंपित तरी सह्याचलाचे कडे;

काळाचा जरि काळ येउनि उभा ठाकेल यांच्यापुढें
सह्याचे रणधीर पुत्र नच त्या होतील हे बापुडे !
सेनासागर हा अफाट बघुनी रेवातटीं थाटला
पोवाडा अति भव्य बाणहृदयीं त्याचा जरी दाटला,
सेनासागर हा तुझा परि नृपा ! येणें न आतां पुढें
लाटांचें बळ हें पडेल सहसा याचें इथें तोकडें !
कन्या दक्षिण ही अगस्तिऋषिची विंध्याद्रिला संमत
हा रोधील सदैव विंध्य तुझिया सेनासमुद्राप्रत !
येथें तीं नच नांदतात हरिणें,—हें दंडकाचें वन,
व्याघ्रांचें गिरिगव्हरांतुनि धुमे येथें शिलोत्पाटन !
भीतीनें तव हीन हूणहरिणें गेलीं दिगंता जरी,
वीर्योत्कर्ष तुझा बघोनि जगती झाली जरी बावरी,
प्रेमें मालवसिंधुगुर्जर तुला मानोत हर्षा ! प्रभु,
नाहीं, ही परि शौर्यशुल्कसुलभा नाहीं महाराष्ट्रभू !
राष्ट्राचा रणघोष गाजवुनि हा चालुक्यचूडामणी
हर्षाचा परराज्यलोभ तुडवी पायातळीं तो रणीं;
सत्याचा अभिमान वाहुनिच तो भूपाळ सत्याश्रय
हर्षामर्षहि तुच्छ लेखुनि रणीं झाला तया दुर्जय !

* * *

जातां स्वर्भुवनीं शिवप्रभु पुढें स्वातंत्र्यवीराग्रणी
धर्मोन्मूलनकार्य योजुनि मनीं सावेश दिल्लीहुनी
सम्राट् सैन्य असंख्य घेउनि महाराष्ट्रावरी आदळे,
लोकांचें तिळमात्र धैर्य न परी त्याच्या भयानें ढळे.
झाली शंभुवधें क्षणैक जनता निःस्तब्ध शोकें जरी
नाहीं मालवली कधींच मनिंची स्वातंत्र्यनिष्ठा तरी;

धर्मोच्छेद करावयास सजला,–मानील कां त्या प्रभु
स्वातंत्र्यप्रिय शंभुराजरुधिरस्नाता महाराष्ट्रभू ?
घाली पायघड्या फुलें पसरुनी सृष्टी जिथें संतत,
गंगासिंधुतुषारशीतल सदा वाहे जिथें मारुत,
जेथें जानपदां न युद्धपटहस्फीतध्वनी ऐकवे,
भोगैकप्रिय कान्यकुब्ज अथवा काश्मीर तो हा नव्हे !
दिल्लीवल्लभपाणिपल्लवघनच्छायेंत हें निर्भय
होतें गर्जत सैन्य !–तें परि इथें पावेल आतां लय–
सह्याच्या खडकाळ माळ दरडी उल्लंघितां यापुढें !
धर्मध्वंसनकार्य हें नच तुझ्या हातून आतां घडे !
नाहीं ! दास म्हणोनि शक्य जगणें नाहीं महाराष्ट्र हा !
स्वातंत्र्यास्तव संगरीं झगडणें ही एक याची स्पृहा !
ही जाणीव पुनः पुन्हा पटवुनी दिल्लीपतीच्या मना
धर्माच्या जयघोषणीं जिरविल्या त्याच्या वृथा जल्पना !
यावच्चंद्रदिवाकरौ तव महाराष्ट्रा ! यशोदुंदुभि
विश्वीं गाजविला पुन्हा करुनि ती स्वातंत्र्यशाही उभी !
झाले वीर विनष्ट आज जरि ते,–तें चित्र अत्युज्ज्वल
आहे दृष्टिपुढें तसेंच ! करितें चित्तास शोकाकुल !

* * *

झाला लुप्त तुझा स्वभावच महाराष्ट्रा ! कसा आज तो
तेजोभंग न राष्ट्र मानधन जें त्याला असा साजतो.
तेजोभंग तुझा असा परि कसा झाला न कांहीं कळे,
कोणाचा तुज शाप भोंवुनि तुझी तेजस्विता मावळे ?
स्वातंत्र्याविण जें जिणें विफळ तें तेव्हां तुला वाटलें,
स्वातंत्र्योत्कट दिव्य भाव तव ते सारेच कां आटले ?

जावो, वैभव तें अशाश्वत तुझें गेलें लयाला जरी,
बुद्धिभ्रंश पुढें असा तव महाराष्ट्रा! न व्हावा परी.
काळाची करणी कठोर,—तुडवी तो वस्तुजाता जरी
त्याला अद्‌भुतरम्य राष्ट्रयश हें दुर्लंघ्य आहे तरी!
काळाला न कदापि शक्य करणें विच्छिन्न ज्यांचीं यशें
आहे दिव्य चरित्रचित्र तुझिया त्या पूर्वजांचें असें!
त्यांचें विक्रमवैभवस्मरण हें चित्ता तुझ्या चेतवो!
स्वातंत्र्योत्कटभाव जागृत करो! तेजस्विता द्योतवो!
बुद्धिभ्रंश अशेष लोपुनि, महाराष्ट्रा! पुन्हा विस्मित
होवो पाहुनि विश्वमंडल तुझें शार्दूलविक्रीडित!

२४।७।२०, मुंबई

## स्मरण

—हा घेऊन निरोप मी परतलों जाया घरातें पुन्हा,
माझें खाउनि ओढ चित्त परि कां मागेंच रेंगाळतें?
त्याचीं लाडिक भाषणें, प्रिय तशी प्राणांहुनी संगती
यांचा लोभ सुटे न, संपुनि जरी गेली सुखाची निशा.
काव्याच्या परिशीलनांत अथवा गप्पांत कांहीं तरी
एकामागुनि एक ते न कळतां गेले निघूनी क्षण;
तारांची मधुर द्युती पसरुनी विश्वावरी जेधवां
रात्रीचें भयद स्वरूपहि गमे गंभीर—शांतिप्रद,
तेव्हां बैसुनि बोललों बहुपरी रस्त्यांत कट्ट्यावरी
गोष्टी आणि अनेक उज्ज्वल मनोराज्येंहि केलीं उभीं;
तें सारेंहि मनांत येउनि पुन्हा मातें असें वाटलें—
कीं, स्वप्नें न अशक्य कोटिंतिल तीं, होतील आतां खरीं!

—तों डोळ्यांपुढतीं चरित्र अपुलें राही उभें मागलें,
अन् हें चित्त तुला स्मरून सहसा शोकें जळूं लागलें.

२१।२।२४, पुणें

## दर्शन

मी पाहीन तुला कधीं मज असें होतें सदा वाटत,
झाल्या वृत्ति विलीन सर्वहि तुझी येतांच मूर्ती पुढें.
अस्ताला कलतां सुधांशु दिसते जी पौर्णिमा पांडुर
तीचें म्लान परंतु दिव्य विलसे भाळावरी तेज या;
खेळे खिन्न मुखावरी क्षणभरी जें बोलतांना स्मित
चित्ताला करिते विषण्ण अगदीं त्याची उदासीनता;
काळेभोर विशाळ लोचन अहा, त्यांच्यामध्यें बिंबली
संध्येची रमणीय शांति; सुचवी हें पांढरें पातळ—
दैवानें भर यौवनांत तुज जी संन्यासदीक्षा दिली,
झालें जीवित शून्य आणि वठलें वैधव्य देहावर.
बाणाची प्रतिमाच केवळ महाश्वेता, तिचें दर्शन
झालें, तूं पडतांच दृष्टिस, असें माझ्या जिवा वाटलें.

किंवा भेटुनि जातसे मजसि जी स्वप्नांत केव्हां तरी
झाला हा पितृहीन माय म्हणुनी ये काय ती भूवरी ?

२३।२।२४, पुणें

## उषा

होतों पुस्तक घेउनी सहज मी दारांत त्यांच्या उभा,
बाला तोंच समोरुनी कुणितरी आली त्वरेनें पुढें.
वाऱ्यानें उडुनी पुनःपुनरपि चंद्रास जे झांकिती
मागें सारित—सांवरीत पदरा—ते मोकळे कुंतल,

किंचित् हासुनि बोलली मजसि ती अस्पष्ट कांहीं तरी,
किंवा स्पष्ट असेल तें, समजलें मातें न तेव्हां पण;
होतों स्तब्ध तसाच मी,–मजकडे डोळे तिचे लागले;
त्यांचें तेज खुले मुखावरि; रवी जातांच खालीं जरा
त्याची मावळती प्रभा पसरुनी रंगे जशी वारुणी,
गोऱ्या, नाजुक या तनूवर तशी शोभे छटा तांबुस;
नाहीं पार्थिव भाव ज्यास शिवले, स्वर्गीय जें शैशव
त्याची ही रमणीय मूर्तिच उभी माझ्यापुढें राहिली.

मीं त्यानंतर पाहिलें नच तिला,–वर्षें किती लोटलीं ?
चित्ताच्या क्षितिजावरुन परि ती नाहीं उषा लोपली.

२५।२।२४, डेक्कन कॉलेज

## शुक्रतारा

मी जेव्हां तुज पाहतों तळपतां सूर्यास्त झाल्यावर,
उत्कंठा हृदयांत दाटुनि मला तेव्हां असें वाटतें:
आली घेउनि रत्नदीप गगनीं कांतास शोधावया
कालाची भगिनी,–प्रभा मधुर ही त्याचीच कां फाकली ?
किंवा ज्यांतुनि इंदिरा प्रगटली तें दिव्य हेमांबुज
या गंभीर, अथांग सिंधुवरती शून्याचिया शोभतें;
कीं हें कष्ट करुन विश्व शिणलें त्याला निशा द्यावया
येते शांति,—सदैव दूतच तिचा तूं काय अग्रेसर ?

तूं प्रात:समयीं परंतु दिससी पूर्वेकडे जेधवां
तेव्हां हर्षित चित्त होउनि मनीं ही कल्पना येतसे:
ओल लावुनि दृष्टि ज्यावर मुनी ख्रिस्तास शोधीत ते–
ज्याच्यामागुनि,–तोच काय असशी तेजाळ तूं तारक ?

द्वेषाग्नी भडकून विश्व जळतें—हें भोगितें यातना,
तो श्रेयस्कर मार्ग दाविशिल का तूं आज त्याला पुन्हा ?

२८।२।२४, येरवडा

## निवेदन

—आतां मी कविता लिहीन म्हणुनी आहे जरी योजिलें,
कीर्तीची न तथापि चाड उरली, किंवा स्वदेशाप्रत
द्यावी स्फूर्ति नवीन हाहि उरला उत्साह नाहीं मला;
हौसेखातर आणि हांव धरुनी पूर्वी यशाची तशी
केली जी रचना,—कवित्व नच तें किंवा न ती वैखरी—
चित्तांतून उचंबळून सहसा बाहेर जी येतसे;
स्वप्नें जीं मन पाहतें निशिदिनीं किंवा जिव्हाळा तसा
आयुष्यांतिल,--भाव हे नच कधीं मीं त्यांत रेखाटले.

चित्तीं आणुनि प्यार फार कविता आहे तुला हें परी
केला निश्चय, चिंतनांत तुझिया तल्लीन होतां जरा
जे जे भाव मनांत दाटति परी ज्यांना न वाचा फुटे
एकांतांतहि, तेच ओतिन पुढें काव्यांत मी आपुल्या.
—तीं तूं लावुनि चित्त वाचशिल का ? जें घोळतें या मनीं
तें सारें कळलें तुला तरि पुरे, कांहीं नको याहुनी.

१।३।२४, येरवडा

## क्रांति

राज्यांचे उदयास्त भूवर जरी झाले असंख्यात या,
क्रांत्या दोनच रोमहर्षण परी होऊन गेल्या जगीं.
ध्येयें उज्ज्वल त्यांतुनी प्रगटलीं, भूकंप झाल्यावर
होती जेवि नवे प्रदेश सहसा उत्पन्न त्यांच्यामुळें.



नं. ........

त्यांचा स्फोट—अनर्थ केवळ नृपां—होतांच तो वाटला;
केला तीव्र विरोध शक्ति सगळी वेंचून त्यांनीं जरी,
त्यांचे उन्नत वंशवृक्ष मिळुनी गेले धुळीला पुढें.
सत्ता दुर्मद दुर्बळांस छळिते, शासावयाला तिला
रक्ताचा तुडवीत कर्दम सदा ही येतसे निर्घृण
दैवी शक्ति. जरी—जुनाट जग हें उध्वस्त झाल्याविन
नाहीं होतच विश्वसंभव पुन्हा—हें तत्त्व आहे तिचें,
रक्ताचा परि थेंबही न पडतां ही क्रांति झाली पहा!

ही क्रांती न—जगास दर्शन जिचें वाटे अनर्थावह;
स्वातंत्र्यध्वज घेउनी प्रगटला हा दिव्य सत्याग्रह.

७।३।२४, पुणें

## मनस्ताप

पेटो भास्कर हा खुशाल गगनीं; गेलीं उन्हानें जरी
पुष्पें हीं सगळीं जळून अगदीं, पर्वा न त्याची मला.
त्याचें तेज असह्य केवळ न तें नेत्रां जरी सोसवे,
त्याला पाहुनि खोल खोल दडतो अंधार चित्तांत ला.
रात्रीची परि जेधवां पसरते विश्वावरी काजळी
तेव्हां दारुण तें तमिस्रहि मनःसृष्टीस व्यापी पुन्हा.
काळोखास भयाण त्या विचकुनी शून्यामध्यें वावरे
वेडा जीव; तयास गांठुनि तिथें पूर्वस्मृती गांजिती.
खेळे मूर्ति तुझी सदैव दिवसा डोळ्यांपुढें ही, मला
त्याचें कांहिं न वाटतें परि; असे निर्जीव ती संगत;
ती गोडी न मुळींच त्यांत असतां प्रत्यक्ष जी भोगिली,
स्वप्नांतील परंतु दर्शन तुझें अत्यंत हें दुःसह.

देवा रे ! मरतांच वल्लभ झणीं प्रीतीस तूं संहरीं,
नाहीं मृत्यु हिला—म्हणून छळिते ही नित्य वैऱ्यापरी.

१।३।२४, पुणें

## याचना

सोसूं ही छळणूक कोठवर मी ? नाहींच का शक्य हा
चित्तांतील वियोगवन्हि शमणें ? लागून त्याची धग
आकांक्षा पिचतात नित्य,—दिसते त्यांची चिता ही पुढें.
तो उत्साह—चढून जाइन सुखें मी कीर्तिकैलास हा;
आत्मप्रत्यय तोहि—तुच्छ जग हें ज्याच्यामुळें वाटलें;
गेल्या हाय, परंतु आज जिरुनी साऱ्या मनाच्या उड्या,
हातीं राखच ही अखेर उरली—हैराण झाला जिव;
अश्रूही निववावयास धग ही नाहींत डोळ्यांमधें.
सोसायास मुळीं न शक्ति,—परि हें बोलून दावूं कुणा ?
ज्याला मी अपुलें म्हणेन न असें आतां कुणी राहिलें;
माझी सोशिन मीच आग; जग हें धांवे सुखामागुन,
माझें लादुनि दुःख त्यावर कसें त्याला करूं मी श्रमी ?

काळा ! फेंक खुशाल तूं मजवरी वाटेल तें आयुध,
प्रीतीचा परि फांस लावुनि नको आतां करूं पारध.

१५।३।२४, पुणें

# माधव जूलियन्

## तें पुष्प

ज्या पुष्पास्तव मीं तुझ्या विनवण्या केल्या, वृथा जाहल्या.
मी वाईट मनास वाटुनि किती त्याच्यामुळें घेतलें !
"माझें हेंच नशीब" मन्त्र जपतां प्राणावरी बेतलें—
गेलें दुक्ख थिजूनि आणि सरिता डोळ्यांतल्या आटल्या.
गेला काळ, सुधारली स्थिति, जुनी होई स्मृती मागली,
माझ्यापासुनि चोरुनी सुमन तें अन्यास तों तूं दिलें,
पञ्चप्राण तयाकडे निशिदिनीं होते तयें वेधिलें.
—थोडीशी रुजली कुठें जखम ती वाहूं पुन्हा लागली !
कांहीं या पुढती तुला जर कधीं द्यावें मला वाटलें,
त्यावेळीं तर तूं कृपा करुनि ती सद्वासना आवरीं;
राहो दूरच सूख, मीठच जणूं साण्डेल रक्तावरी !
साङ्गूं काय कसें तुला हृदयिं जे माझ्या असें दाटलें !

यावी विस्मृतिची प्रचण्ड लहरी, पोटांत घ्यावें तिनें !
प्रीतीनें मजला असें ठकवितां रेङ्गाळतीं कां दिनें ?

## श्यामा—रजनी

सखये, रजनी तुझ्यासम दिसते श्यामल आणि सुन्दर;
प्रणयी, सुखशान्त, शीतल अशि ही; तूं न तशी, नशीब हें !
करिती गगनांत तारका नयनांचा तव मूक मत्सर;
मज पाहुनि त्या खुणावितीं; बघशी तूं न परी——नशीब हें !

दिसतो बहु अन्तरावर मज कन्दील परन्तु अन्धुक;
दिसते जरि त्यामुळें दिशा परि अन्धार किती पथावर ! ३

पवनाकुल डाहळीवर अथवा रम्य सुखोष्ण कोटरीं,
अथवा घरट्यांत पांखरें निजलीं; जाग्रत मीच एकला. ४

विसरूनि दिनास लोटल्या गवती टोळ इथेंच झोंपतो;
इतका जरि नीच हा जिव, तरि माझ्याहुनि हा गमे सुखी. ५

निजली असशील तूं प्रिये अपुल्या अन्थरुणावरी मऊ,
न विचार मनीं न काळजी; अलकांशीं तव वायु खेळत. ६

परि मी फिरतों भिरीभिरी, करितो सोबत रात्रिकीटक;
न कुठें घर; आणि अन्तरीं सलतो सन्तत मात्र कण्टक ! ७

## कुमारी पिरोजा

धूसरशा केसांची वेणी
अर्धसैल लोळे पाठीवर;
फीत लाल तकतकित रेशमी,
गाठ तिची टोंकाला सुन्दर. १

यष्टि दिसे नाजूक मुलायम
बर्फाच्छादित सरूतरूसम,
जो वाऱ्यानें डुलुनि वांकुनिहि,
ऊर्ध्व सरलगति राहि गुणोत्तम. २

तलम मलमलीचा अङ्गावर
तङ्ग झगा बक-शुभ्र मनोहर;
अस्पष्ट तयामधुनी खुलती
अवयव गोण्डस प्रमाणसुन्दर. ३

तुरळक तुरळक झग्यास झालर
ती साधेंपण अधिकचि खुलवी;
सदभिरुचि अशी हें साधेंपण
कोणाच्या हृदयास न फुलवी ! ४

काळ्या जाळीच्या मोजांतुनि
जङ्घा या हिमकान्ति विलसती
स्वर्गङ्गेचे प्रवाह जैसे
नभःपटीं अवसेच्या दिसती. ५

बूट काजळी नरम घालुनी
हिमस्नात मृदु तृणाङ्कुरांवर
चपल सलील परी डौलानें
चाले, मोहक जणूं कबूतर ! ६

गुल्म गुलाबाचे फुललेले,
फिरत फिरत जाई त्यांजवळी;
हातीं धरुनी चुम्बी, हुङ्गी,
मधुनि मधुनि हृदयाशीं कवळी. ७

अहा परंतु हिचे हे डोळे !
दिसावयाला अगदीं भोळे,
बेडर, निष्पाप, मनोवेधक—
औदार्याचे कुवेच बेशक ! ८

अर्धोन्नत वक्षावर हांसे
फूल गुलाबी सपर्ण खासें;
परी फूल हें नामी कसलें ?
जरा वर पहा, किती विकसले! ९

किती विकसले गुलाब गालीं !
परि अजुनी लज्जेची लाली
तारुण्याच्या नव्या प्रीतिची
नाहीं शिवली हिला अकालीं. १०

खेळाडूपण खुल्या दिलाचें
प्रफुल्ल वदनीं खुले निरामय;
प्रसन्नता, स्वातन्त्र्यप्रियता—
हृदय हिचें दे यांना आश्रय. ११

पद्य कसलेंसें गुणगुणतांना
मधेंच थाम्बुनि घे ही ताना.
किती हळू ! परि त्या ऐकाया
वाटे येती कान फुलांना ! १२

थाम्बुनि मी निःशङ्क खुशाल
असतां न्याहाळीत चारुता,
सहज भेटले क्षण डोळ्यांना
डोळे काळेभोर विशाल. १३

दृष्टि काढुनी परि मजवरुनी
फिरे पिरोजा ही निजतन्त्रें;
जागींच उभा परन्तु मी स्थिर
भारियलेला अनुक्त मन्त्रें. १४

## भ्रान्त तुम्हां कां पडे

हिन्दपुत्रांनो स्वतांला लेखितां कां बापडे ? भ्रान्त तुम्हां कां पडे ?
वाघिणीचें दूध प्यालां, वाघबच्चे फाकडे होतसां कां भेंकडे ? १
हिन्दभू, वीरप्रसू ख्याती जिची लोकीं अशी कां बसावी दीनशी ?
धन्यता द्याया कुशीला अङ्ग झाडा, व्हा खडे ! भ्रांत० २
पूर्वजांची थोरवी ठेवा मनीं, बोलूं नका; झिङ्गुनी डोलूं नका;
लक्ष्य द्या चोहींकडे, द्या काल-वैशिष्ट्याकडे ! भ्रांत० ३

ज्ञान-गङ्गा वाहते पूर्वेकडे, घाला उड्या; अंतरीं मारा बुड्या;
सम्पली पूर्व-ग्रहांची रात्र, झालें ताम्बडें. भ्रान्त० ४

मोकळी ही खा हवा, चैतन्य अङ्गीं खेळवा; आत्मशुद्धी मेळवा;
मुण्डिती जे फक्त डोकें तेच गोटे कोरडे. भ्रान्त० ५

कां वडाई श्रेष्ठतेची ? जाति-दर्पाला त्यजा; हिन्दु-तत्वाला भजा;
लोकसेवा, ज्ञानवृद्धी हीं कराया व्हा सडे. भ्रान्त० ६

उच्चनीचत्वास कर्तव्यीं न थारा; लायकी जाणुनी घ्या काम कीं!
खानदानींतील नादाना, करीं घे पावडें. भ्रान्त० ७

पार कर्तव्यास पाडी धन्य त्याची जिन्दगी, मान्य त्याची बन्दगी;
'कर्मजा सिद्धिर्!' न गीतावाक्य हें खोटें पडे! भ्रान्त० ८

लेखणी, बन्दूक घ्या, वा तागडी वा नाङ्गर; व्हा प्रभूचे चाकर;
एक रक्ताचेच आहों, साक्ष देई आंतडें. भ्रान्त० ९

एकनाथाची कशी आम्हांस होई विस्मृती ? थोर त्याची संस्कृती
जो कडे घे अन्त्यजाचें पोर तान्हें शेम्बडें! भ्रान्त० १०

सङ्कराची, बण्डखोरीची उभारा, या ध्वजा! उन्नति स्वातन्त्र्य-जा!
राजकी का गांवकी ? सारीं झुगारा जोखडें! भ्रान्त० ११

भारतीं देवालयीं बत्तीस कोटी देवता जागत्या, त्या पावतां
मुक्ति हो, ये स्वर्ग खालीं—कोण पाही वांकडें? भ्रान्त० १२

पोट जाळायास देव्हारे पुजारी माजवी, ईश्वराला लाजवी;
मुख्य दीक्षा काय ? जी दे आळशाला दोकडे. भ्रान्त० १३

'बुत्शिकन्' व्हा; 'बुत्फरोशी' माजली धर्मांत ही; भक्त व्हा सत्याग्रही;
चेतवा वा पेटवा हें रूढ-धर्मांचें मढें! भ्रान्त० १४

आचरा शान्ति-क्षमा; निन्दोत ते जे निन्दिती! संयमीला न क्षिती;
सोडितां प्रेमास्त्र वैराची क्षणीं बाधा झडे. भ्रान्त० १५

प्रेमनीती ही अहिंसा वाटतां नामर्दुमी; मर्दुमी दावा तुम्ही;
हुक्मतीचे-दौलतीचे सोडवा युद्धीं लढे. भ्रान्त० १६

स्वार्थही राष्ट्रीय दृष्टीनें पहा जी नेहमीं उन्नतीची घे हमी;
जो अहिन्दी त्याजला ठेवा दुरी, चारा खडे. भ्रान्त० १७

दुस्मनाला घे घरीं, मारी स्वबन्धूला सुरी स्वार्थ जो हा आसुरी
तो अति प्राचीन शत्रू हिन्द-देशाला नडे. भ्रान्त० १८

तो असो जैचन्द वा राघो भरारी वा कुणी, तो स्वराज्याचा खुनी!
हांकुनी धिक्कारुनी द्या त्यास सैतानाकडे! भ्रान्त० १९

इच्छितां स्वातन्त्र्य, द्या स्वातन्त्र्य अन्याला तुम्ही; दाखवा ही रुस्तुमी;
कां गुलामांचे तुम्हां सुल्तान होणें आवडे? भ्रान्त० २०

"जो बचेंगे तो लडेंगे!" शूर दत्ताजी वदे, स्वामिकार्यी जीव दे;
शौर्य तें दावाल का कळे मिशांचे आंकडे? भ्रान्त० २१

काळ राष्ट्रांच्या चढाओढींत लोटी खामखा; अन्ध ऐशाराम कां?
स्वर्ग जिङ्का वा मही! ऐका रणींचे चौघडे. भ्रान्त० २२

कायदा पाळा गतीचा; काळ मागें लागला; थाम्बला तो सम्पला!
धावत्याला शक्ति येई आणि रस्ता सांपडे. भ्रान्त० २३

हिन्दपुत्रांनो, हिताचें तें तुम्ही हातीं धरा, एरव्ही माफी करा;
शब्द माझे बोबडे अन् चित्त माझें बावडें, ज्ञान माझें तोकडें. २४

## आमची मायबोली

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे;
नसे बाह्य ऐश्वर्य या माउलीला, यशाची पुढें थोर आशा असे;
न मातब्बरी पञ्चखण्डान्तरीं ती जरी मान्यता पावली इङ्ग्रजां!
भिकारीण आई जहाली म्हणूनी कुशीचा तिच्या तीस केवीं त्यजी? १

जरी मान्यता आज हिन्दीस देई उदेलें नवें राष्ट्र हें हिन्दवी,
दिलाचा मराठा मराठीस वन्दी हिची जाणुनी योग्यता थोरवी;
असो दूर पेशावरीं उत्तरीं तो, असो दख्खनीं दूर तन्जावरीं,
मराठीच माझी म्हणे मायबोली प्रतिष्ठापुनी मूर्ति अभ्यन्तरीं. २

मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं,
सहिष्णुत्व अङ्गीं पुरें बाणलेलें, हिच्या एक ताटांत आम्ही बसूं;
हिचे पुत्र आम्ही हिचे पाङ्ग फेडूं, वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरीं,
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें, हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं! ३

हिच्या लक्तरांची असे लाज आम्हां, नका फक्त पाहूं हिच्या लक्तरां;
हिचें कुद्रती रूप लावण्य देखा जयाचा रसज्ञांमधीं अस्करा;
न घालूं जरी वाङ्मयांतील उंची हिरेमोतियाचे हिला दागिने,
मराठी असे आमुची मायबोली, कशाला बढाई, कशाला जिणें? ४

करण्टी दरिद्री नसे जन्मतां ही; हिची थोर सम्पत्ति कालोदरीं
पचेना, उपेक्षेमुळें राहिलेली, झणीं तीस बाहेर काढूं तरी!
कशाला हवी लूट? देतील भाषा जगाच्या हिला वाढती खण्डणी—
मराठी असे आपुली मायबोली! मराठे, झिजूं या हिच्या कारणीं! ५

## सद्गुणसुन्दरी

किति मैल अन्तर राहिलें अपुल्यांत सद्‌गुणसुन्दरी?
किति मास अन्तर जाहलें अपुल्यांत यौवनमञ्जरी? १

तव मुग्ध शान्त मुखच्छवी, खुलली कळी जणु मानवी;
स्मृति दाखवी सुषमा नवी, विरहींहि दे सुख अन्तरीं. २

सित कान्ति किञ्चित आरुणी भुलवी; न ही परि वारुणी;
म्हणतो गुलाब तुझा ऋणी 'हिमशैलजा अघ संहरी.' ३

तव लम्बवर्तुळ चेहरा लव हांसरा, लव लाजरा;
नवनींत बालिशता जरा मज धीर दे भवसङ्गरीं. ४

नजरेंत जादुगिरी पुरी, अनुरागवर्धक माधुरी;
नहि मत्त मादक आसुरी, नहि तीक्ष्ण मारक खञ्जरी. ५

तव गीत मञ्जुळ थाम्बलें तरि ऐकुं ये मज मागलें;
पडसाद तें उठवी मनीं यमुनातटीं जशि बांसरी. ६

फुलपांखरापरि धावरी तव वृत्ति खूश फुलांवरी—
कधिं पाप हें न घडो प्रभो! कुणि घालणें तुज पञ्जरीं! ७

निजतन्त्रतेंत तरङ्गशी, अपुल्या सुखांतच रङ्गशी;
परि पापभीरु तुझ्या मना न रुचे कधींच कलन्दरी. ८

सहजेक्षणीं तव शोभली नव शान्तता मज लाभली;
बनलों फकीर कबीर मी—मजला कशास शिकन्दरी? ९

जर उन्नती तव चिन्तनें, जर सद्गती तव दर्शनें,
तर कां भवास वृथा भिणें, लपणें कुठें गिरिकन्दरीं? १०

# दोन विभूती

मी पाहूनि विभूति दोन नमलों त्यांच्यापुढें तत्क्षणीं!
लक्ष्मीपुत्र सुलक्षणी, शुभ असे संस्कार दोघांवरी;
दोघेही गुरु-शुक्र—मित्रच म्हणा; दोघे विचाराग्रणी;
शोभे एक ऋषी रसज्ञ; दुसरा संन्यासदीक्षा वरी.
दाढीदार सतेज भव्य वदनीं गाम्भीर्य हें प्रेमळ,
अङ्गीं नाजुक उन्च रेशिम—झगा, टोपी शिरीं मखमली;
त्याची क्षीण तपाळ मूर्ति, परि तद्हास्यीं नभोमङ्गल,
नेसे तो निजहातकांतिवसुता कौपीन जाडी भली.

हा गीताञ्जलिनें दिगन्त पसरी हिन्दी यशोवैभव,
इच्छी पश्चिमपूर्वसङ्गम, वधे आणूं नवी संस्कृती;
तो सत्याग्रहवीर रावत परी कैदेंत सत्यास्तव,
अध्यापी नव राजनीति, पटवी स्वाङ्गें करूनी कृती.
हा ठाकूर रवीन्द्रनाथ चढला साहित्य-सम्राट्पदा,
गान्धी मोहनदास तो अनुभवी येशूपरी आपदा.

## प्रबोधन

उषा जाहली जागी; सखे, तूंहि हो क्षणीं!
उषेसारखा उन्ची करी साज साजणी. १

उषारूप दावाया असे सिन्धु आयना;
पहा तूं बहारीचें तुझें रूप दर्पणीं. २

उषेसङ्गती भानू धुक्यांतूनि ये वरी;
स्तवूं यांस सूक्तांनीं–किती रम्य पर्वणी! ३

“ फिरा या मऊ वेळेवरी वा गिरीवरी,
उठा प्रेमयुग्मांनो!” सखे ऐक अश्रणी. ४

समुद्री हवा खारी सुखें सेवुनी फिरूं;
वनश्रीसही भेटूं–सती पूज्य देखणी. ५

लपूनी लताकुञ्जीं करूं प्रेम-कूजनें;
पडूं वा सुखारामीं हरित् शाद्वलाङ्गणीं. ६

तिथें पुष्प-गुल्मांचे उभे दाट ताटवे,
तुझी वेणि गुम्फाया करूं पुष्प-सन्चणी. ७

म्हणूं एक आवाजें तुझ्या आवडींतली
खऱ्या प्रेमलीलेची रसोदात्त लावणी. ८

गुलाबी तुझी निद्रा असो साखरी परी
पुरें सोङ्ग हें आतां ! गडे ऊठ या क्षणीं ! ९

# अल्लाहु अक्बर !

## —नव्या मनूंतील हिन्दी फकिराचें गाणें—

ये राज्य कोणा, कोणा फकीरी;
ये दास्य कोणा, कोणा अमीरी;
कोणी शिकन्दर्, कोणी दिगम्बर्—
अल्मुल्कु लिल्लाह्[१] ! अल्लाहु अक्बर्[२] ! १
हा दैववादी दैवा निखन्दी,
तो कर्मवादी देवास वन्दी;
निर्द्वन्द्व कोणी योगी कलन्दर्,
गुङ्गे जपे: ॐ ! अल्लाहु अक्बर् ! २
राष्ट्राभिमानी, स्वार्थाभिमानी,
ज्ञानाभिमानी, कर्माभिमानी
नाना मतांचे नाना पयम्बर्[३] !
अल्लाहु आलम्[४], अल्लाहु अक्बर् ! ३
काफीर आम्हीं अल्लास वानूं,
मुस्लीम आम्ही रामास मानूं,
स्रष्टा जगाचा तो एक ईश्वर्—
ईयाक नाबुद्[५] ! अल्लाहु अक्बर् ! ४
'ब्रह्मास्मि' बोला, बोला 'अनल्हक्[६]' !
सायुज्य मुक्ती चित्सौख्य बे-शक् !

---

१ राज्य ईश्वराचें आहे. २ ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. ३ पैगम्बर, प्रेषित ४ ईश्वर सर्वज्ञ आहे. ५ तुलाच आम्ही पूजितों. ६ मी सत्य आहें.

जाणा जहन्नम्–बेहेस्त नश्वर्–
स्थायी प्रभू तो ! अल्लाहु अक्बर् ! ५
'धर्माप्रमाणें ही देशभक्ती'[1]
चैतन्य ताजें ओतील रक्तीं,
हिन्दी जिवांची एकी निरन्तर्–
'जै हिन्द !' गर्जा; अल्लाहु अक्बर् ! ६
'अल्फक्रु फख्री'[2] ! मागूनि भिक्षा
–सद्ब्राह्मणांची जी मुख्य दीक्षा–
आजन्म आम्ही राष्ट्रीय नौकर्–
अल्हम्दु लिल्लाह्[3] ! अल्लाहु अक्बर् ! ७
आरोग्य, शक्ती देशास लाभो !
ऐश्वर्य, मुक्ती राष्ट्रास लाभो !
सर्वत्र होवो राष्ट्रीय सङ्कर् !
वन्दे तमीशं ! अल्लाहु अक्बर् ! ८
दाता मिळो वा, कद्रू मिळो वा;
टक्का मिळो वा, धक्का मिळो वा;
छाया खुदाची आम्हांस बक्तर्–
अल्हम्दु लिल्लाह् ! अल्लाहु अक्बर् ! ९

## कौमुदी, विषाद आणि सङ्गीत

रजनीस लाभला नव नवरीच्या आनन्दाचा नूर्.

चन्द्र ओती दुग्धधारा      आर्द्र करि दवप्रान्त सारा,

---

१ हुब्बुल्वतन् मिनल् ईमान्.   २ मला दारिद्र्याचा अभिमान वाटतो.   ३ ईश्वराची स्तुति असो.

## उषा

जणुं धूर रुप्याचा उधळी अथवा हिम किंवा कापूर्. १
शुक्रतारा दीप विलसे, कृत्तिकेचा पुञ्ज न दिसे
हो ब्रह्महृदय तो फिका, हरपला व्याधाचा मग्दूर्. २
दुग्धगङ्गा गुप्त गगनीं, दुग्धगङ्गा व्यक्त भुवनीं,
नदिपात्रावरुनी अधान्तरीं वाहून सूचवी पूर् . ३
चन्द्रिकेची धवलिमा ही– शारदेची जणुं क्षमा ही
कां वेड्या तेव्हा मनीं माझिया थयथयवी हुर्हूर् ? ४
शुक्र टाकी नजर मागें अस्त–गिरि अन् उतरुं लागे;
मी गिरीपठारीं फिरतों माझ्या विचारामधें धूर् . ५
अन्धुके ती गर्द झाडी शहर मध्यें झोंप काढी
परि दीप तेवती खडा पहारा करिती हें मह्शूर. ६
कातळाची गार शय्या चान्दण्याची वरुनि छाया
सैतान मनांतिल झोंपायाचा परन्तु कुठला क्रूर् ? ७
बाह्य सृष्टी शान्त झाली वायुलाही झोंप आली,
तों भास जाहला कीं वाजवितें सारङ्गी कुणि दूर् . ८
उन्च चढती आणि पडती मधुनि मधुनी खोल दडती,
खेळती हवेवर शान्त तरङ्गात सारङ्गाचे सूर्. ९
जवळ आले, स्पष्ट झाले दूर गेले, गुप्त झाले,
परि हृदयीं भरले, पार निवळला आंतिल भेसुर धूर्. १०
वस्ति नाहीं, वेळ नाहीं ना मुखानें याचनाही,
सारङ्गीवाला कोण औलिया गेला वाद्यचतूर् ? ११
प्रार्थना सङ्गीत करुनी लुप्त हो औदास्य हरुनी
भारुनी टाकिलें भरुनी गानें त्यानें मन दुप्पूर्. १२
कोण कोठें राहणारा ? भेटशिल का कधिं उदारा ?
सुरदास मिरा वा कबीर गमशी वा रोबी ठाकूर्. १३

# दत्तात्रय लक्ष्मण गोखले

## चल वल्लभे बघुं वांकुनी

चल वांकुनी बघतेस का ? चल वल्लभे, बघुं वांकुनी.

"वरतीं सभोंतीं हें धुकें लाटांवरी लाटा किती;
तव कुंतलीं वस्त्रावरी कणिका हिऱ्यांच्या फेंकितीं !
वेणींतल्या पुष्पांवरी जलमौक्तिकें झालीं जमा !
मुख रंगलें, श्रमविव्हले ! धरि सिक्तचंपकाविभ्रमा !
—कां हांसली टक लावुनी, अधरोष्ठ दांतें रोकुनी ?
चल वांकुनी बघतेस का ? चल वल्लभे, बघुं वांकुनी.

" पायीं धुक्याच्या सागरीं पक्षी फिरे मीनापरी;
घाली उडी हा स्रोत–कां निःशब्दता नांदे पुरी !
वेगें निघाला भेटण्या कोणा सखीतें चोरुनी ?
—दृष्टीस कोठें वाव या परि शुभ्र काळोखांतुनी ?
आकाशिच्या पवनें पहा पट टाकिला हा फाडुनी;
चल वांकुनी बघतेस का ? चल वल्लभे, बघुं वांकुनी.

" निघतां किती चुकवोनिया मज घाबरें केलें तुवां,
परि गांठुनी तरुखालती त्या जोडिला मनचा दुवा.
मग पाय सोडोनी जळीं बसलों शिळेवर एकटे;
—पाण्यांत पाहुनि दूर तूं किति लाजुनी सरलीस तें !
तें स्थान कोठें–स्पष्ट–हो !–बघ तेंच का तें हेरुनी.
चल वांकुनी बघतेस का ? चल वल्लभे, बघुं वांकुनी.

गवतांत खेळे साप कीं झाडींतुनी रस्ता वळे.
राईवरी फिरतो पहा तो धूर, तें गृह आपलें.

श्रवणीं न येई आपल्या आलापिती पक्षी तिथें,
ज्यांनीं तुला अभिनंदिलें तव ऐकुनी मधु गीतितें.
बालार्कतेजें रंगली सृष्टी तिथें उल्हासुनी;
चल वांकुनी बघतेस का ? चल वल्लभे, बघुं वांकुनी.

" हा स्रोत पाताळीं पडे तों पीठ त्याचें होतसे;
अधँ तिथें नव रंगलें हरिचाप हेलावें पिसें,
धावे पळे उसळे किती जळ होति का त्या वेदना—
जपुनीच!–जातां तोल हा–तुज काय त्याची कल्पना !
किति कांपशी ही ! ये अशी ये हात हातीं घेउनी.
चल वांकुनी बघतेस का ? चल वल्लभे, बघुं वांकुनी.

" झाली रुप्याची तार कीं जादूमुळें सरिता पहा;
सारीपटासम रेखलीं इवलीं तिथें शेतें अहा !
" कीं दुर्बिणीची लागली उलटी नळी ही दृष्टितें—"

—" चुकल्या परी मज होतसे, वाटे कशी आलें इथें;
भय शैशवाची होउनी लागे मनाला कांचणी.
छे वांकुनी पाहूं नये. जाऊंच आतां येथुनी."

" वेडी मनाची कल्पना; आतां न तें साधें कधीं.
क्षण एकही पद टाकतां कधि कां फिरे मार्गामधीं ?
जरि खालतीं जावें मनीं चढणें पडे वरतीं पुन्हा ?
गत चिन्हही न दिसे कधीं हें थोर पुण्याईविना.
आकाशिंच्या प्रवरें पहा पट टाकिला हा सांधुनी.
चल वांकुनी दिसतें कुठें ? चल वल्लभे, वर चालुनी."

दत्तात्रय लक्ष्मण गोखले

## मनिं काय कळेना हाय

मनिं काय ? । कळेना, हाय ! । होत निरुपाय । खरें नच वदसी;
कधिं आशा दाविसि कधीं उदासच दिसशी
भाषणीं । तरी अनुदिनीं । जवळ येउनी । नर्मवच करिसी
'मी तुमची' म्हणसी परी बोलतां हंससी
हिमशुभ्र । विरलघन जरी । विधुमुखावरी । मोहना पसरी
क्षणिं दावी, दडवी मनोवंचना करी
त्यापरी । जरी वरिवरी । हास्यमाधुरी । मुखीं तव विलसे
मन आर्त तरल होउनी सारखें फसे
लोचनीं । पसरुनी भूल । दावुनी हूल । केलि चुकभूल
हळुहळू विदारित हृदय लाविलें खूळ
मी दीन । जाहलों हीन । तळमळे मीन । जीवनापाशीं
तूं द्रवसी अंतरिं परी अबोलचि जाशी
—कीं गडे । तुला आवडे । जरी आंतडें । तुटतसे माझें
कां भरले डोळे तुझे, हृदय निःश्वासें ?
मी अधीर । करुनी धीर । हातिंचा तीर । सोडुनी पाहूं
—तूं लाजाळू संकोचसि, वाटे बाऊ.
बोलतां । सहज सांगतां । हेतु भोंवतां । फिरे तव वचन
परि पुसतां स्पष्टचि उलटी देसी खूण
लांबुनी । प्रेम दावुनी । दीप भारुनी । पतंगा ओढी
परि ऐन समयिं जाळुनी पंख त्या पाडी
'हंऽ बोल । मंजुले खोल । हृदय तव खोल' । वदूं तरि म्हणसी
'मन्मनिंची भाषा नवल कळे तुम्हांसी'
मज कळे । किती तळमळे । व्याजचंचले । नित्य मन तवही
परि बोलाविण तव नसे विसावा लवही !



दा. क्र. २५७०

# श्रीधर बाळकृष्ण रानडे

## माझा मृत्यु

नसेल नशिबीं मरण सागरीं; नसो ! येउं दे वनीं तरी !
निबिड तरूंच्या रानामाजी निर्झरकांठीं कुठें तरी.
गळून पडलीं पिवळीं पानें, मिळेल त्यांचें अंथरुण
कोळी जाळें विणील वरती, होइल खासें पांघरुण.
सळसळ करुनी नाग येउनी छत्र फणेचें धरिल वरी,
घौं घौं करुनी भोंवति माशा गोष्टी करितिल परोपरी.
माना घालुनि लता खालती, टेकुनि वृक्षांवरि गाल
कींव येउनी अश्रू ढाळित उभ्या राहतिल चिरकाल.
फांद्या कडकड करुनी तरुवर दावि मनोगत यावेळीं
पायांजवळीं स्तब्ध बसोनी मूक रुदन करि कुणि वेली.
मंजुरवानें गाणीं गातिल अखेर मजला विहगगण
धरील निर्झर ताल हळु जणुं स्वर्गी गाई देवगण.
मयूर तांडव करील तेथें, मैना गातिलही कांहीं,
गातिल वेली, गातिल तरुवर, सुस्वर कोल्हीं घुबडेंही.
गिरिवर देउनि प्रतिध्वनी मग, देतां उत्तेजन गाना
गाइल सगळें रान मला; मग अशा मृत्युचें भय कोणा !

## प्रवाहांतील फांदी

पूर नदीचा प्रबळ वाहतो क्षिती नसे त्याला
मुळापासुनी उपटुनि टाकी प्रचंड वृक्षाला !
लहान निर्बल शाखा अवचित पडते पात्रांत
क्षुद्र तरी ती जरा बदलिते सरितेचें पात्र !

# एक वर्ष

वसंत—
मधुमासानें भेट धाडिली
अखेरची नव कलिका अपुली
जीवनतरणी स्थिरतर झाली
कलिका प्रेमानें खुलली
जीवितध्येय मना गमली.

ग्रीष्म—
असूयाग्निचें वारें सुटलें
ग्रीष्मभानुनें विश्व जाळिलें
हरित सृष्टिचें सुख कुसकरलें
आग भडकली हृदयांत
ध्येय दग्धलें वन्हींत.

वर्षा—
वळीव कोसळले अश्रूंचे
मनःपथावरि कर्दम सांचे
दुथडी भरली कविता नाचे
सुन्न जहाल्या दहा दिशा
नुरली ध्येयाची आशा.

शरद्—
शरच्चंद्रकरलोला रजनी
स्मित मृदु चमके तारावदनीं
ज्योत्स्नागानें निजली अवनी
शांत विश्व परि आग मनीं
ध्येयजल न दे तरि कोणी.

हेमंत—
आनंदाचीं जळलीं रानें
सुखस्वप्नांचीं गळलीं पानें
पोखरला तरु—जीव किड्यानें



ग्रंथ संग्रहालय

जीवनरस तो ध्येयाचा
सुकला; बिंदु न मिळण्याचा!

शिशिर— निराश थंडी पडे भयंकर
जननिंदेचा जळतो रवि वर
असह्य झाला जीवनभार
विटलें मानस जगताला
हरहर मुकलें ध्येयाला!

वसंत— आनंदाला किसलय फुटले
पराग कलिकेनिकट नाचले
शिरीषसुम रोमांचित झालें
वसंत बहरे सौख्याचा
शोध लागला ध्येयाचा!

ध्येय हरपलें भ्रांति मनाला
धरिलें त्यानें दृढ हृदयाला
वर्ष हिंडलों शोधित त्याला
सुटलें प्रेमाचें वारें
हृदयीं ध्येयीं भेद नुरे!

## सोड मग भीती मृत्युची

प्रथम सासरीं कन्या जाते, नयनांची त्रेधा!
एक स्वगृहीं, दुजी सासरीं होते दृष्टि द्विधा!
नयनांपुढुनी माहेराच्या लटुपटु खेळांचीं,
चित्रें जातीं गत गोष्टींचीं, प्रेमळ आप्तांचीं!
पुसट स्मृतीचें रूप मनोहर दिसतें नयनांला,
विसरुनि मन परि उत्सुक भावी सौख्य चिंतनाला!

दुसऱ्या नयनापुढें चकमतें अश्रुधुक्यांतून
भावी जीवित-इंद्रचाप तें, आशेचें ऊन !
नूतन परिचय-उत्सुक हृदयां प्रीती दे मोद !
कर्तव्याचा, मातृपदाचा अस्फुट आनंद !
परस्परांना रंग खुलविती, चमके इंद्रधनू
तीच स्थिति तुज आली जीवा ! भाग्य किती वानूं !

माहेराहुनि-या पृथ्वीवरुनी श्रेष्ठ सुखें पुढचीं.
इंद्रचाप तुज हवें ?-सोड मग भीती मृत्यूची !

# सौ. मनोरमाबाई रानडे

## काननीं जाउनी राहूं

काननीं जाउनी राहूं
चल गडे, शांति सौख्यांत !
हीं गुलाब-कुसुमें अगदीं
कुचकामी मजला दिसतीं;
याभाळिचीं सुंदर पुष्पें
माझें मन मोहित करितीं;
सरितेच्या तीरावरती
बांधावा आश्रम रम्य;
चिरकाल सुखानें नांदूं
आलोक सेवुनी काम्य !
मृगबाळें रानामधलीं–
प्रेमानें येतिल जवळी--
त्वत्प्रीति बघुनि त्यावेळीं;
तूं वाढिव त्यां प्रेमानें,
विसरतील तीं निज मातें.

सहकारतरूच्या खालीं
घालुनी करीं कर जाऊं;
कोकिलादिगान श्रवुनी
डोलत गे ! काव्यीं राहूं !
जाउनी वायु वंशांत
देईल गान मधु गात,
अलगूज न मज आवडत !
मोदानें आपण राहूं
सोडुनिया या संसारा !
निर्झरिणीतीरीं बसुनी
घालवूं काळ रात्रीचा;
विमलौघ जलाचा वाहे,
तैसेंच हृदय हें माझें;
प्रतिबिंब इंदुचें जैसें,
त्वत्प्रतिमा मन्मनिं तैशी;

आपणां नको उद्यान,
पाहिजे परी तें रान;
बंगला नको ऐटीचा
झोंपडी बरी ती सान;

प्रीतिचें गान गावोनी
स्वर्गी ने तिथें तूं मजशीं
पक्षीही झाडांवरुनी
उत्साहा देतिल गानीं,

जगतास पूर्ण विसरोनी
फिरतील सदा तुजमागें,
प्रेमें तूं धरशिल त्यांना !

अस्मानी दुलई नभ हें
थंडीला नेइल हरुनी;
गवताची हिरवी गादी
चित्तास शांति दे रानीं;
तीं कंदफळें वृक्षांचीं
अशनही आपलें साधें

कल्पना सुखद मनिं येती
मन तिकडे ललिते, वेधे
बोलविती मज तरुराजि,
जाण्या मी तिकडे राजी,
यावी ही दयिता माझी;
आपुलें वृक्षराई ती
स्वागत शिर नमवुनि करिल !

आभरणें स्वर्णाचीं तीं—
कृत्रिम ! दे टाकुनि सारीं

अक्षय्य रुचिर पुष्पांचीं
देतिल तुज शोभा भारी;
भृंगावलि येइल निकटीं
सेवुनि तव तनुचा गंध;
गुंजारविं त्यांच्या मिळुनी
स्तवन करिल अनिल मृदु मंद;

स्वर्गीय असें तें रान,
विसरविल जगाचें भान,
अमृताचें देइल पान,
जाउनियां केवळ दोघें,
राहूं त्या रम्य ठिकाणीं !

सोडुनी सर्व लोकांना
वृक्षांना करुं या मित्र;
आश्लेष तयां द्यायातें
सर्वथैव असती पात्र;
पारंब्यांवरती बसुनी
आंदोलनिं कंठूं काल !
पृथ्वीही अपुल्यासंगें
आंदोलन घेइल वेगें !

कल्पनापक्षिं बैसोनी,
मारुं या भराऱ्या गगनीं,

दृश्याचीं काव्यें करुनी
चिर सौख्यीं जीवित वितरूं
चल गडे, शांतिसौख्यांत !

## प्रेमकलहांतरितेचें पत्र

प्रेमाची कलिका अकालिं गळली ! हें काय झालें बरें ! !
नाहीं हें उपमान योग्य ठरलें !—त्वत्प्रेम संपे कधीं ! !
वेडी मी ! परि काय हें वरळतें ! हें ऐकिलें कां कधीं—
कीं व्योमामधली अशेष सहसा आटोनि गेली नदी !
देहातीतपणें यथेच्छ विहरूं कोणी म्हणूं लागली
ती हास्यार्ह ! समान सर्व गणिते विश्वीं स्वयें स्वर्धुनी
एकादीसच बुद्धिवैभवबलें लाभे सुख प्रीतिचें
मी तों एक अबुद्ध क्षुद्र अबला !—आशा कशाला तरी !
धर्मीं पापच आत्मघात गणिलें !—नाहीं दुजें पुण्यहीं
जन्मीं आचरलें ! करूं मग कशी मी घोर तें साहस !
चित्तातें परि हा विचार न पटे एका क्षणानंतर !
प्रेमाच्या प्रतिनादिं कर्ण बहिरे !—राहूं कशाला तरी !

विश्वप्रीतिकरा ! सुमंजुल कवे ! सौंदर्यप्राप्तीरुचे !
इच्छा एकच—सत्वरीं मज अतां मृत्युंगता होउं दे !

१९१८, पुणें

## भिकारीण

भिकारिण झालें । तुजपुढें हात पसरीले ।
अखिल जगाला ये कंटाळा.
शाप शेंकडों येति कपाळा
मारुनि हकलुनि देती मजला
अशा या काळीं । तुजकडे भिकारिण आली.
तूं प्रेमाचें, सदयत्वाचें,

उदारतेचें, विद्वत्तेचें,
दातृत्वाचें, नैतिकतेचें,
असति माहेर । चिंता मम होइल दूर.
वस्त्राभरणीं देह नटावा,
वसतिस्थाना हर्म्य असावा,
वाहनांत आराम मिळावा—
नसे मुळिं वांछा । तव कृपा हीच मम इच्छा !

* * *

सार्थक झालें मम जन्माचें
उदार भिक्षा लाभायाचें
भाग्य उघडलें, सहर्ष नाचे—
मन्मन आतां । भलभलतें भकुं दे जनता !

१९२०, पुणें

## सौंदर्यें नटल्या दिशा--

सौंदर्यें नटल्या दिशा सकळही, आकाश ज्योत्स्नायशें.
चाले हांसत हांसवीत जगता प्रेमप्रकर्षें शशी,
जाती एकवटूनि विश्वहृदयीं निष्पाप सद्भावना,
गुंगोनी मनिं आठवी प्रणयिनी प्रेमाचिया भाषणा,
विष्णू पाठवि शीतरश्मिस नभीं क्षीरोदधी निर्मल,
दुग्धाची करि पौर्णिमा विधु अजी खैरात पृथ्वीवर.

रम्यालोक जगास ! काय परि तें होई मला ! दुःसह !!
लागे आग जगास आज गमतें, नाहीं कुठें शीतल.

जाई होरपळून जीव सहसा विश्लेषधारेवर,
ज्या ज्या उद्भवती विकारलहरी तैशाच जाती लया.
भाग्याचीं असतील त्यांस रुचते शोभा निसर्गीतली,
दुर्दैव्यास, मनांतल्यासम तर्मी, लोपूं गमे केवळ !

१७।१०।२१

## पुष्पास

माझा जीव फुले तुलाच बघुनी, तैसेंच त्या कारण !
नेत्रा केवळ तोषदायि न मना, साऱ्यांत तूं भूषण.
साक्षीदार म्हणूनि होसि पहिल्या भेटीस तूं आमुच्या,
विश्वाची सुषमा तुझ्यांत, गमतें ! देसी स्मृती पूर्वीच्या.

पुष्पा पावन जाहलेंसि मृदुल स्पर्शें तयांच्या तदा,
कालाघात न मानुनी वरियली प्रत्यग्रता तूं सदा.
आलापें नव प्रेमराग कथिसी, बेभान वृत्ती बने.
त्या वृत्तींत समाधिमाजि जगणें—आयुष्य हें भोगणें.

८।३।२२

# नारायण वामन टिळक

बाळें गोंडस--पंख ज्यां चिमुकले--आलीं उपवनीं
वाटे कीं फुलपांखरें शिशुमिषें हीं दंग पवनीं,
गेले भृंगहि गुंजना विसरुनी, पक्षी थबकले,
सारें भोंवतिं सामसूम बनलें, हो मन्मन खुळें!
घेती तोडुनि देवदूत चिमणे पत्रीसह फुलें.
कोणाशीं न कुणी वदे, झडकरी तों हार बनले;
मातें राहवलें न, उत्कटपणें मीं त्यांस पुसलें
"हें कोणास्तव आज काय करतां? हे हार कसले?"
बाळें एक--मुखें क्षणांत वदलीं गांभीर्य वरुनी
"आम्हांला कवि लाभलेत अमुचे या मंगल दिनीं,
त्यांचा उत्सव आज वार्षिक असे,"--बोलोनि इतुकें
झालीं लुप्त झणीं; तिथें परि उभा मी स्तब्ध कुतुकें.

"विष्णूची तरि वैजयंति नलगे;--ती काय न तुटे?
झालों सार्थ फुलांमुलांतिल कवी"--वायू पुटपुटे.

१।५।२३, पुणें

यशवंत

ग्रं. क्र. 2460

REFBK-0002570

REFBK-0002570

# अनुक्रमणिका


| कविता | वृत्त | पान |
| --- | --- | --- |
| टिळकांच्या समाधीपाशीं | शा० वि० | १ |
| निष्फळ प्रतीक्षा | गज्जल | २ |
| अभिसारिका | सुनीत | २ |
| ताजमहाल आणि प्रीति | सुनीत | ३ |
| सुधेस | भूपतिवैभव | ४ |
| मिळेल कां कधिं | केशवकरणी | ४ |
| जलक्रीडा | गज्जल | ६ |
| चिमुकल्या वसंतास | इंदुकला | ७ |
| विश्वाची रमणीयता | सुनीत | ७ |
| श्रीशिवरायास | सुनीत | ८ |
| खलांनों | गज्जल | ९ |
| प्रेमाची दौलत | भूपतिवैभव | १० |
| कर्तव्यकर्म | सुनीत | ११ |
| बाळपण | सुनीत | १२ |
| कोणाचे आम्ही कोण | बालानंद | १२ |
| जागेपणचें स्वप्न | वधूवल्ली | १६ |
| नरकचतुर्दशी | सुनीत | १७ |
| मैत्रीचें सिंहावलोकन | सुनीत | १७ |
| विसरलेला नमस्कार | सुनीत | १८ |
| शांतिस्थान | इंदुकला-सुलभा | १९ |
| गोड आठवण | गज्जल | २१ |
| शनवार वाडा | गज्जल | २२ |
| विश्रामबागेजवळ | दिंडी | २३ |
| गोपाळ कृष्ण गोखले | सुनीत | २४ |
| सप्तर्षि | सुनीत | २५ |
| एक प्रसंग | दिंडी | २६ |
| भगवा झेंडा | चंद्रकांत | २८ |
| कालचा महाराष्ट्र | शा० वि० | २९ |

| | | |
|---|---|---|
| स्मरण | सुनीत | ३२ |
| दर्शन | सुनीत | ३३ |
| उषा | सुनीत | ३३ |
| शुक्रतारा | सुनीत | ३४ |
| निवेदन | सुनीत | ३५ |
| क्रांति | सुनीत | ३५ |
| मनस्ताप | सुनीत | ३६ |
| याचना | सुनीत | ३७ |
| तें पुष्प | सुनीत | ३८ |
| श्यामारजनी | वियोगिनी | ३८ |
| कुमारी पिरोजा | पादाकुलक | ३९ |
| भ्रान्त तुम्हां कां पडे | मुस्तजाद | ४० |
| आमची मायबोली | श्लोक | ४२ |
| सद्गुणसुंदरी | गझ्जल | ४३ |
| दोन विभूती | सुनीत | ४४ |
| प्रबोधन | गझ्जल | ४५ |
| अल्लाहु अक्बर् | गझ्जल | ४६ |
| कौमुदी, विषाद व संगीत | सारंगी | ४७ |
| चल वल्लभे | गझ्जल | ४९ |
| मनिं काय | शारदा | ५१ |
| माझा मृत्यु | स्वर्गंगा | ५२ |
| प्रवाहांतील फांदी | चंद्रकांत | ५२ |
| एक वर्ष | बालानंद | ५३ |
| सोड मग भीती | चंद्रकांत | ५४ |
| काननीं जाउनी राहूं | राजहंस | ५६ |
| प्रेमकलहांतरिता | सुनीत | ५८ |
| भिकारीण | वधूवल्ली | ५८ |
| सौंदर्य नटल्या | शा० वि० | ५९ |
| पुष्पास | शा० वि० | ६० |
| टिळक | शार्दूलललित | ६१ |